LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय
प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी
9422295333
8623880100

# पार्श्वभूमी

बीड वर्ष ३६ वे अंक ७५ वा फोन २३०१०१ दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

# बीडमध्ये पोलीस भरतीत धावतांना उमेदवाराचा मृत्यू, आई, वडिलांवर दु:खाचा डोंगर, ८ हजार उमेदवार आले



बीड दि.११ (प्रतिनिधी):- येथील पोलीस विभागामध्ये १७४ जागांसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरु झाली असून ८ हजार १३४ अर्ज प्राप्त झालेले आहेत. दररोज अंदाजे १ हजार ते १२०० विद्यार्थ्यांची मैदानी चाचणी, परीक्षा घेतली जात आहे. मंगळवारी ८०० उमेदवारांची मैदानी चाचणी ठेवण्यात आली होती. त्यापैकी ६१८ उमेदवार मैदानी चाचणीसाठी हजर होते, त्यापैकी ४९६ उमेदवार मैदानी चाचणीसाठी पात्र ठरले व त्यांची चाचणी घेण्यात आली. मात्र १०० मीटर धावण्याच्या चाचणीनंतर उमेदवार दीपक भास्कर वाव्हळे (वय २६ वर्ष, रा.मांडखेल ता.परळी) याला अस्वस्थ वाटू लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले, मात्र उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. दीपकच्या आई, वडिलांवर दु:खाचा डोंगर कोसळलेला आहे. या भरतीसाठी ८ हजार १३४ उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत. मैदानी चाचणी झाल्यानंतर लेखी परीक्षा होणार आहेत.

## पळाल्यानंतर दीपकला अस्वस्थ वाटू लागले



मैदानी चाचणीसाठी उमेदवार दीपक वाव्हळे याने १६०० मीटर धावणे पूर्ण केले. सीसी टीव्हीमध्ये हे दिसत आहे. दुपारी १२.५५ वाजता त्याने १६०० मीटर धावणे पूर्ण केल्यानंतर विश्रांती घेतली. त्यानंतर तो मेडिकल रुमकडे जातांना दिसून आला. डॉक्टरांनी त्यास प्राथमिक उपचार दिले मात्र नाडी तपासल्यानंतर रुग्णवाहिका बोलाविण्यात आली आणि १ वाजून १४ मिनीटांनी त्याला जिल्हा रुग्णालयाकडे नेण्यात आले. रुग्णालयात डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यास मृत घोषीत करण्यात आले. दीपकच्या पश्चात आई, वडील, भाऊ असा परिवार आहे.



## एस.पीं.चे लक्ष असल्याने पारदर्शक प्रक्रिया

पोलीस भरतीसाठी पोलीस अधीक्षकांनी अत्यंत पारदर्शक प्रक्रिया सुरु केली आहे. मैदानी चाचणी असो किंवा इतर सर्व हालचाली आणि चाचण्या सीसी टीव्हीच्या निगराणीमध्ये होत आहेत. भरतीसाठी अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. भरतीच्या संदर्भात कोणीही पैशाची मागणी केली तर तात्काळ माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी लक्ष घातल्यामुळे बीडची भरती प्रक्रिया १००% पारदर्शक होत आहे.

## अशा दुर्दैवी घटनांमुळे धावण्याचे अंतर कमी केले

पुर्वी पोलीस भरती प्रक्रियेमध्ये मैदानावर धावणे यासाठी ५ कि.मी.चे अंतर होते. ५ कि.मी. पळत असतांना अनेक तरुणांना जीव गमवावा लागला. त्यामुळे शासनाने नियमात बदल करत ५ कि.मी. ऐवजी आता १६०० मीटर म्हणजे दीड कि.मी.पेक्षा १०० मीटर जास्त एवढे अंतर ठेवले आहे. जेणेकरुन धावताना दुर्दैवी घटना घडू नये हाच त्या पाठिमागचा हेतू आहे.

## आमिषाला बळी पडू नका -एस.पी.काँवत

सध्या बीड येथील पोलीस मैदानावर भरती प्रक्रिया चालू आहे. या भरतीसाठी बाहेर कोणी नोकरी लावतो म्हणून पैसे मागत असेल, काही प्रलोभने देत असेल तर अशा लोकांच्या कुठल्याही आमिषाला बळी पडू नका, भरती प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक व नियमानुसार होईल. जर कोणी अशा पद्धतीचे प्रकार करत असतील तर तात्काळ माझ्याकडे तक्रार करा, मी कारवाई करतो असे एस.पी.नवनीत काँवत यांनी म्हटले आहे. भरती प्रक्रियेवर पूर्णपणे पोलीस अधीक्षक लक्ष ठेवून आहेत.

## मैदानावर उमेदवारांना सर्व सुविधा

पोलीस भरतीसाठी मैदानावर चाचणी देण्यासाठी आलेल्या उमेदवारांसाठी जेवण व पाण्याची व्यवस्था पोलीस मुख्यालयात करण्यात आली आहे. सर्व उमेदवारांनी पुरेसा आहार व पुरेसे पाणी घ्यावे, आरोग्याची काळजी घ्यावी अशा सूचना पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिल्या आहेत.

## पारदर्शक भरती व्हावी म्हणून सीसी टीव्ही कॅमेरे

येथील पोलीस मुख्यालयावर भरती प्रक्रिया सुरु आहे. १६०० मीटर धावणे, गोळाफेक अशा मैदानी चाचण्या घेतल्या जातात. यामध्ये कुठेही आरोप, प्रत्यारोप होऊ नयेत. भरती प्रक्रिया १००% पारदर्शक व्हावी म्हणून मैदानात सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर १७४ पोलीस शिपाई पदाकरिता भरती प्रक्रिया सुरु झालेली आहे. मंगळवारी ६१८ उमेदवारांची मैदानी चाचणी झाली. गेल्या अनेक महिन्यांपासून पोलीस भरतीसाठी विशेष करुन ग्रामीण भागातील युवक हे मेहनत घेत आहेत त्यामुळेच मोठ्या प्रमाणात उमेदवारांनी अर्ज दाखल केले. जिल्हा पोलीस यंत्रणेने भरती प्रक्रियासाठी जय्यत तयारी केलेली आहे.

# आज विविध कर्मचारी संघटनांचे धरणे आंदोलन

बीड दि.११ (प्रतिनिधी):- राज्य सरकारी/निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, जिल्हा परिपषद कर्मचारी महासंघ, कंत्राटी कर्मचारी संघटना, असंघटीत शेतकरी, शेतमजूर कष्टीकरी संघटनांसह जिल्ह्यातील इतर सर्व विविध कामगार संघटना या विविध मागण्यासाठी आज दि.१२ फेब्रूवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्यभर सत्याग्रह धरणे आंदोलन करणार आहेत.

या सत्याग्रह धरणे आंदोलनाच्या प्रमुख मागण्या नवीन पेन्शन योजना (NPS) रद्द करुन सर्वांना जुनी पेन्शन योजना (OPS) पूर्वलक्षी प्रभावाने लागू करा. कंत्राटी व योजना कामगार प्रदिर्घकाळ सेवेत असल्यामुळे सर्वांना समान किमान वेतन देऊन त्यांच्या सेवा नियमित करा. सर्व रिक्त पदे तात्काळ भरा. (आरोग्य विभागास अग्रक्रम द्या) तसेच चतुर्थ श्रेणी व वाहन चालक कर्मचाऱ्यांच्या पद भरतीस केलेला मज्जाव तात्काळ हटवा. अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या बिनशर्त करा. तसेच कोरोना काळात मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वयाधिक झालेल्या पाल्यांना विहीत वय मर्यादित सूट द्या. सर्व अनुषंगिक भत्ते केंद्रासमान मंजूर करा. (वाहतूक, शैक्षणिक व इतर भत्ते) चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची मंजूर पदे निरसित करु नका. चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेने मांडलेल्या इतर सर्व प्रलंबित मागण्या सत्वर मंजूर करा. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवांतर्गत प्रश्न (सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना १०:२०:३० वर्षे व इतर) तात्काळ सोडवा. निवृत्तीचे वय ६० वर्षे करा. नवीन शिक्षण धोरण रद्द करा. नर्सेस/आरोग्य कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सेवा विषयक समस्यांचे तात्काळ पान २ वर

# अवैध वाळूची वाहतूक करणारा टेम्पो पकडला



बीड दि.११ (प्रतिनिधी):- शहराजवळ अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर उपअधीक्षक पूजा पवार यांनी कारवाई केली. यात सुमारे १० लाखांचा मुद्देमाल जप्त करत एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.११ रोजी दुपारी ३.४५ वाजण्याच्या सुमारास उपअधीक्षक पूजा पवार यांना अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. यावरून त्यांनी पथकाला संबंधित ठिकाणी कारवाई पान २ वर

# पुरुषोत्तमपुरी मंदिराचा कारभार पारदर्शक एक रुपयाही खाल्ला नाही -विजय गोळेकर





- भगवान पुरूषोत्तम मंदिराचे काम दर्जेदार, पारदर्शक पध्दतीने प्रगतीपथावर
- मंदिराचे ८० लक्ष ट्रस्टकडे सुरक्षित ठेवीच्या स्वरूपात जमा
- मंदिराची अकरा एकर जमिनीचे उत्पन्न दुसरेच लोक खाऊ लागले
- मंदिरासह विश्वस्तांना बदनाम करण्याचे मोठे षडयंत्र
- येणाऱ्या अधिकमासामुळे विरोधकांची काव काव सुरू
- तक्रारदारांनी वर्षात देवाचे एकदाही दर्शन घेतलेले नाही
- गेल्या अधिक मासातील उत्पन्नाचा दररोज अहवाल दिला

माजलगाव दि. ११ (प्रतिनिधी):- देशातील एकमेव भगवान पुरूषोत्तम मंदिराचे काम हे दर्जेदार आणि पारदर्शक पध्दतीने प्रगतीपथावर आहे तर मंदिराचे ८० लक्ष रूपये ट्रस्टकडे सुरक्षित ठेवीच्या स्वरूपात जमा आहेत. मंदिराची ११ एकर जमिनीचे उत्पन्न हे गावातील काही लोक फुकट खात आहेत. आमचा मंदिर विकासाचा कारभार पारदर्शी असुन आम्ही एक रूपया खाल्ला नाही आणि खावु दिला नाही. त्यामुळे विरोधकांची ही ओरड म्हणजे पावसाळ्यात उगवलेल्या छत्र्या प्रमाणे अधिकामासात उगवतात. त्यामुळे यातुन मानसिक त्रास आणि बदनाम करण्याचे षडयंत्र असल्याचे समितीचे अध्यक्ष विजय गोळेकर, माजी सरपंच भाउसाहेब गोळेकर यांनी सांगीतले. तालुक्यातील पुरूषोत्तमपुरी येथे गोदावरीकाठी एकमेव पान २ वर




# बीड न.प. स्थायी समिती बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागरांनी मांडला शहर विकासाचा रोडमॅप



बीड दि.११ (प्रतिनिधी):- बीड नगरपरिषदेच्या स्थायी समितीची पहिली बैठक बुधवारी (दि.११) पार पडली असून या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासंबंधी विविध महत्त्वाचे मुद्दे चर्चेला आले. भाजपच्या गटनेत्या व स्थायी समिती सदस्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी बीड शहरवासीयांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसह भविष्यातील विकास आराखड्यासंदर्भात अनेक प्रस्ताव सभागृहासमोर मांडले.

नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, समिती सभापती, सदस्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२६-२०२७ अंतर्गत शहरातील विविध भागांमध्ये रस्ते व नाली बांधकामासाठी कामांची नावे सुचवली तसेच नगर परिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प बसवणे आणि हद्दवाढ भागात ५०० नवीन विद्युत खांब उभारण्यासाठी विद्युत मंडळाकडे प्रस्ताव पान २ वर

पाहिजेत
2 रिसेप्शनिष्ट
3 साफसफाई कर्मचारी
(रुम सर्व्हीस)
गरजुंनी संपर्क करावा.
: भेटण्याची वेळ :
दु.12.00 ते 4.00
हॉटेल साई पॅलेस
जालना रोड, बीड.
16547

गाळा विकणे आहे
सिद्धीविनायक शॉपींग कॉम्प्लेक्स समोर, वैद्यनाथ बॅंकेच्या शेजारी, ब्युटी कलेक्शनच्या वर, 10 x 32 चा गाळा विकणे आहे.
:: संपर्क ::
9021555544
9890000660
P.P.

# अतिवृष्टी नुकसानीच्या आपत्ती पश्चात गरजांचे मूल्यांकनासाठी केंद्रीय पथकाचा बीड जिल्हा दौरा



बीड दि.११ (प्रतिनिधी):- अतिवृष्टीमुळे २०२५ च्या पावसाळ्यात राज्यातील विविध जिल्ह्यांत झालेल्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेण्यासाठी पोस्ट डिझास्टर नीड्स असेसमेंट आपत्तीपश्चात गरजांचे मूल्यांकनपथक राज्यात दाखल झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्राच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातील तज्ज्ञांचे पथक बीडसह मराठवाड्यातील प्रभावित जिल्ह्यांना भेट देत आहे. पथकात पुढील अधिकारी आहेत. श्री. एम. विनोथ, सौ. वंदना श्रीवास्तव, श्री. सुहास मोहोती, श्री. रोहित कुमार व सौ. वैशाली मस्के. राज्याच्या महसूल व वन विभाग, मदत व पुनर्वसन विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी यासंदर्भात पत्र जारी केले असून, या पथकाचा दौरा १० ते १३ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. पावसाळ्यात झालेल्या हानी-नुकसानीचा सखोल अभ्यास करून त्याचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला जाणार आहे. या अहवालाच्या आधारे राज्याला केंद्राकडून भरपाई निधी मिळण्यास मदत होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.
या पथकाचे दोन उपगट करण्यात आले आहेत. यापैकी एक उपगट सोलापूर व धाराशिव जिल्ह्यांची पाहणी करणार असून दुसरा उपगट छत्रपती संभाजीनगर, बीड व अहिल्यानगर या जिल्ह्यांना भेट देणार आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सूचित केल्यानुसार व निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले. बीड जिल्ह्यातील बाधित भागांची प्रत्यक्ष पाहणी ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. आधी केंद्रीय पथकाने यावेळी गेवराई तालुक्यातील खामगाव, राक्षस भुवन, धोंडराई, गेवराई, हिरापूर, ईटकूर या ठिकाणी भेटी दिल्या. संपूर्ण दौऱ्याच्या दरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार संदीप खोमणे, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, तालुका कृषी अधिकारी श्री गिरी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे, पाटबंधारे विभागाचे अधिकारी, नायब तहसीलदार संजय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक जयराज उबाळे व विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
यानंतर पथकाने बीड तालुक्यातील नांदूर हवेली येथील सिंदफणा नदीच्या काठालगत खरडून गेलेल्या जमिनीची आणि गाळाने भरलेल्या विहिरी यांची पाहणी केली. यावेळी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, गावचे सरपंच शाहेद पटेल व अनेक गावकरी उपस्थित होते. यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पथकास सविस्तर माहिती दिली. केंद्रीय पथकाने शिरूर मधील प्रमाणात ब्रह्मनाथ येळंब या गावात भेट दिली व तालुक्यातील विविध अधिकारी यांच्यासोबत आपत्ती विषयक चर्चा केली व माहिती घेतली. या पाहणीनंतर तयार होणारा पीडीएनए अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार असून, त्याच्या आधारे शेती, पायाभूत सुविधा, घरे, रस्ते आदी क्षेत्रांतील नुकसानीसाठी केंद्राकडून आर्थिक मदत मिळण्याची अपेक्षा आहे.

# सीएमए इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षेचा निकाल

छत्रपती संभाजी नगर दि.११ (प्रतिनिधी):- द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या सीएमए इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. उत्कृष्ट निकालाची परंपरा राखत यावर्षीही संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थी इंटरमिजिएट परीक्षेत, ग्रुप - १-४३ विद्यार्थी आणि ग्रुप २ मध्ये - १२ विद्यार्थी असे एकूण १०३ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. फायनल परीक्षेत संपूर्ण पास १४ विद्यार्थी, ग्रुप - ३ मध्ये - ५ आणि ग्रुप ४ मध्ये - ११ असे एकूण ३० विद्यार्थी फायनल परीक्षेत पास झाले. इंटरमिजिएट परीक्षेत निकालाची सरासरी ३०% तर फायनल परीक्षेत २३% टक्के इतकी आहे.
छत्रपती संभाजीनगर येथून सीएमए झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत: १) रुतम पंकज जोशी, २) आर्यन भाऊ हिवराळे, ३) शिलप्रिया किशोर कागदे, ४) विशाल दत्तात्रय बोबडे ,५) धनश्री गणेश जोशी, ६) सचिन बाबासाहेब नवले ७), किशोर परमेश्वर बोराडे ८) ,रेवती सुनील कटारिया ,०९) महेश ज्ञानेश्वर बोंबले १०) गौरी प्रमोद खराडकर ११) सार्थक सुहास देवडे, १२) आदिनाथ ज्ञानेश्वर शेळके १३) यश राहुल मुंगळे, १४) अमोल बाबुराव ढोके.
छत्रपती संभाजीनगर चॅप्टर चे अध्यक्ष सीएमए बाबासाहेब शिंदे, उपाध्यक्ष सीएमए सीएस. डॉ. संवेदी राणे, सचिव सीएमए सलमान पठाण, खजिनदार सीएमए सीएस अक्षय दंडे, कार्यकारी सदस्य सीएमए किरण कुलकर्णी आणि प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए विवेक देशपांडे, कार्यकारी सदस्य सीएमए प्रवीण मोहानी, सीएमए राजेश देशमुख या सदस्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.
इंटरमिजिएट आणि फायनल पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन लवकरच करण्यात येणार आहे.

### धनंजय मुंडेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

# संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यात आणखी ११ वसतिगृहे उभारणीस शासनाकडून १५९.३६ कोटी रुपये निधी उपलब्ध

- **ऊसतोड कामगारांच्या मुला – मुलींना दर्जेदार शिक्षणाची वाट मोकळी**
- **स्व. अजितदादांनी बीड येथील ऊसतोड कामगार मेळाव्यात धनंजय मुंडेना दिला होता शब्द!**



मुंबई दि.११ (प्रतिनिधी) - लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.
धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण २२ वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून, उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी जागेसह १५९ कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे.
ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती. त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील ४१ तालुक्यांमध्ये ८२ वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे २२ वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती.
दरम्यान यापैकी तीन वसतीगृहे ही स्वतःच्या जागेमध्ये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून आता आणखी उर्वरित १९ पैकी ११ वसतीगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये परळी सह पाटोदा, गेवराई, केज, माजलगाव या तालुक्यातील प्रत्येकी दोन तर बीड तालुक्यातील एक वसतिगृह उभारले जाणार आहे. तर प्रयत्न वसतिगृह उभारणीसाठी सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.


अजितदादांचा शब्द अन्?
मुंडेंची कृतज्ञता

काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा दौऱ्यावर असताना तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री दिवंगत नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांनी बीड येथे आयोजित एका ऊसतोड कामगारांच्या मेळाव्यामध्ये धनंजय मुंडे यांनी आजपर्यंत ऊसतोड कामगारांसाठी केलेल्या कामाचे कौतुक करतानाच संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेतून सर्व ११ तालुक्यांमध्ये बावीस वसतीगृह ही स्वतःच्या जागेत उभारून देऊ व त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असा शब्द दिला होता, तो शब्द आता पूर्णत्वाकडे जात असून धनंजय मुंडे यांनी स्व. अजितदादा पवार यांची आठवण काढत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री शिरसाट यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

### राजेंद्र मस्के यांच्या पुढाकाराने पाटोदा (बे)पंचक्रोशीतील भक्तांची मागणी पूर्ण

# श्री दत्त मंदिराचे नवे रुप उजळले

बीड दि.११ (प्रतिनिधी):- पाटोदा बेलखंडी परिसरातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कृषी सिंचन क्षमतेत वाढ घडवून आणण्यासाठी साठवण तलाव उभारणीला प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती राष्ट्र वादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली.
मस्के यांनी सांगितले की, या परिसरातील शेती उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी पाण्याचा शाश्वत स्त्रोत निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे आगामी काळात कचारवाडी शिवारात साठवण तलाव मंजूर करून घेण्यासाठी प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल.
नगदी पिकांच्या शेतीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न व जीवनमान उंचावण्यासाठी जलसिंचन सुविधा मजबूत करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. आज लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील पाटोदा (बेलखंडी)



## पाटोदा बेलखंडी शिवारात साठवण तलावाला प्राधान्य देऊ –राजेंद्र मस्के

शिवारातील दत्तनगर येथील उंच टेकडीवरील श्रीदत्त मंदिराकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट पायऱ्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून, या कामाचा लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी उपस्थित लोकांसी संवाद साधला. महंत श्रीधर दादा जामोदेकर व रा.कॉं.शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी भक्तीदास महाराज, माजी सरपंच अमोल बडगे, मंजूर फेडरेशनचे संचालक बद्रीनाथ जटाळ, यांच्या सह पंचक्रोशीतील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीबीएसई १२ वीच्या १ कोटी उत्तरपत्रिका डिजिटल पद्धतीने तपासणार

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसेवा):- यावेळी सीबीएसई १२ वीच्या १७ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टिमने तपासल्या जातील. याचा अर्थ त्या डिजिटल पद्धतीने तपासल्या जातील. सीबीएसई १२ वीची बोर्ड परीक्षा १७ फेब्रुवारी ते १० एप्रिल दरम्यान होणार आहे.
यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्व उत्तरपत्रिकांचे (आन्सर शीट्स) प्रत्येक पान परीक्षा केंद्रातच स्कॅन करून कॉम्प्युटर सिस्टिममध्ये अपलोड केले जाईल. सुमारे १ कोटी उत्तरपत्रिकांची जवळपास ३२ कोटी पाने स्कॅन करून अपलोड केली जातील. परीक्षक या डिजिटल उत्तरपत्रिका तपासूनच गुण देतील. १० वी बोर्ड परीक्षांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी पूर्वीप्रमाणे कागदावरच होईल. सीबीएसईचे परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांच्या मते या नवीन व्यवस्थेमुळे उत्तरपत्रिकांच्या वाहतुकीत लागणारा वेळ आणि खर्च वाचेल. शिक्षक त्यांच्या शाळेत राहूनच मूल्यांकन करू शकतील. मुलांच्या नियमित अभ्यासावर परिणाम होणार नाही. मूल्यांकन अधिक पारदर्शक, जलद आणि चुकाविरहित करण्याच्या उद्देशाने बोर्डाने ही प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

पान १ वरून

## पारदर्शक भरती व्हावी म्हणून सीसी टीव्ही कॅमेरे

**उमेदवारांच्या क्षमतेनुसार त्यांना मार्क दिले जात आहेत. ऑलिम्पिंकमध्ये जी टेक्नॉलॉजी वापरली जाते ते तंत्रज्ञान बीडच्या भरतीसाठी वापरण्यात येत आहे. त्यामुळे भरती १००% पारदर्शक होईल, कोणावरही अन्याय होणार नाही.**

## पुरुषोत्तमपुरी मंदिराचा कारभार पारदर्शकच...

भगवान पुरूषोत्तमाचे प्राचीन मंदिर आहे. दर तिन वर्षाला याठिकाणी अधिकामासा निमीत्त मोठा यात्रोत्सव होतो. भाविकांची प्रचंड गर्दी होती. देशभरातुन प्रचंड भाविक दर्शनाला येतात. पुर्वीच्या काळी या गावी जातांना भाविकांची गैरसोय होत होती परंतु भगवान पुरूषोत्तमावर असलेल्या श्रध्देपोटी भाविक - भक्त येत असत. ही सगळी असुविधा व भक्तांची गर्दी पाहता जिल्ह्याचे तत्कालिन कलेक्टर सुनिल केंद्रेकर यानी जातीने लक्ष घालुन ५४ कोटी ५६ लक्ष रूपयांचा निधी शासनाकडुन मंजुर करून दिला. या निधीतुन मंदिराचे अद्यावत हेमाडपंथी बांधकामांसह भक्तनिवास, गावाला येणारा रस्ता अतिशय भव्य अशा पध्दतीने हे काम होत आहे. भगवान पुरूषोत्तमाच्या मंदिराचे बांधकाम हे प्रगतीपथावर असुन याठिकाणी हे जुन्या पध्दतीचे मंदिर जशास - तसे नव्या पध्दतीने बांधण्यात येत आहे. या मंदिरावर नियोजन करण्यासाठी विश्वस्ताची नोंदणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेली आहे. या मंदिराचा कारभार ही विश्वस्त पाहते. ट्रस्टवर २००६ - ०७ ला आम्ही आलो तेव्हा ३५ हजार ८७२ रूपये ट्रस्टकडे जमा होते आजघडीला ट्रस्टकडे ८० लक्ष रूपयांच्या सुरक्षित ठेवी असल्याचेही त्यांनी यावेळी सांगीतले. मागील तिन वर्षांपुर्वी विश्वस्त मंडळ व मंदिराच्या कारभारावर शरद सोळंके यांनी याच पध्दतीने धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. त्यावेळी आयुक्त साहेबांनी तीन सदस्यांची समिती नेमली होती. पुरूषोत्तमपुरी या गावात तिन दिवस या समितीने मुक्कामी राहुन चौकशी करून निरीक्षण करत समितीने आयुक्तांना अहवाल दिला होता. या अहवालात विश्वस्त मंडळ कारभारात कुठेही दोषी नसल्याचे सिध्द झाले होते. परंतु याच पध्दतीने याही वर्षी अधिकमास सुरू होण्यापूर्वी ईश्वराला न माणणा-या मंडळींनी पुन्हा तक्रार करून आम्हा गावकऱ्यंना व विश्वस्त मंडळाला बदनाम करण्याचे षडयंत्र ही मंडळी रचत आहे. वास्तविक पाहता आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी पुरूषोत्तमपुरी या गावाला जाण्यासाठी दर्जेदार असा रस्ता मुख्यमंत्री निधीतुन देण्याचे जाहिर केले असुन उद्याच्या अधिकमासात काम पुर्ण होईल व भाविक - भक्तांना मंदिराची विकासकामे प्रत्यक्ष पहावयास मिळतील असा विश्वास अध्यक्षांनी व्यक्त करतांना मी या मंदिराच्या विकासकामांचा रक्षक आहे. आम्ही एक रूपया खाणार नाहीत आणि खावु देणार नाहीत अशी भुमिका असुन या मंदिराचा कारभार दर्जेदार, स्वच्छ असा असुन आम्हाला बदनाम करण्याचे षडयंत्र थांबवावे अशी मागणी मंदिर समितीचे अध्यक्ष विजय गोळेकर, माजी सरपंच भाउसाहेब गोळेकर यांनी केली आहे.

## अवैध वाळुची वाहतुक करणारा टेम्पो पकडला

करण्याच्या सूचना दिल्या. यावरून पांगरी-शाहूनगर रोडवरील वासनवाडी परिसरात संशयित टेम्पो आढळून आला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे २ ब्रास वाळू आढळली. पोलिसांनी वाळू आणि टेम्पो असा एकूण १० लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी शेख अरबान सनाउद्दीन (रा.काझी नगर, बीड) याच्याविरुद्ध बीड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सय्यद, पोलिस अंमलदार सचिन आगलावे, सुधीर हजारे यांनी केली.

## आज विविध कर्मचारी संघटनांचे धरणे आंदोलन

निराकरण करा. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांचे सद्या रोखलेले पदोन्नती सत्र तात्काळ सुरु करण्यात यावे. उत्कृष्ट कामासाठी आगाऊ वेतनवाढी देण्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ववत सुरु करण्यात यावी. या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व आदेशांचे पालन करण्यात यावे. वय वर्षे ८० ते १०० या वयातील निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाने विहीत केल्याप्रमाणे मासिक पेन्शनमध्ये वाढ करण्यात यावी. कामगार-कर्मचारी-शिक्षकांच्या हक्कांचा संकोच करणारे कामगार कायद्यातील मालकधार्जिणे बदल रद्द करा. आदिवासी नक्षलग्रस्त भागातील कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने व्यतिरिक्त एकस्तर वेतनवाढीचा लाभ कायम ठेवण्यात यावा व संबंधित कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात यावा. शिक्षण सेवक, ग्रामसेवक आदिंना मिळणाऱ्या मानधनात वाढलेल्या महागाईचा विचार करुन वृध्दी करण्यात यावी. शासकीय विभागात कोणत्याही स्वरुपाच्या खाजगीकरण/कंत्राटीकरणास सक्त मज्जाव करण्यात यावा. पाचव्या वेतन आयोगापासूनच्या वेतन त्रुटीचे निराकरण करण्यास बक्षी समितीला अपयश आले आहे. त्यामुळे याबाबत सखोल पुर्नविचार करुन सर्व संबंधित प्रवर्ग कर्मचारी-शिक्षकांना न्याय देण्यात यावा या व इतर अन्य मागण्यासाठी राज्यभर सत्याग्रह धरणे आंदोलन करणार आहेत.
तरी जिल्ह्यातील सर्व राज्य सरकारी, निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, जिल्हा परिषद महासंघ, कंत्राटी कर्मचारी, असंघटीत कामगार कर्मचारी, शेतकरी कष्टकरी, शेतमजूर संघटनांनी दि. १२ फेब्रूवारी, २०२६ रोजी ११-०० ते २-०० च्या दरम्यान मा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सत्याग्रह धरणे आंदोलनात सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करावे असे अहवान राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी समन्वये समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बा. बा. बडे, जिल्हा सरचिटणीस, रामचंद्र ठोसर, निमंत्रक, राजकुमार कदम यांनी केले आहे. राज्य शासनाने या आंदोलनाची दखल न घेतल्यास यापुढे आंदोलन तिव्र करुन बेमुदत संप करण्यात येईल असा ईशारा देखील या प्रसिध्दीपत्रकाद्वारे देण्यात येत आहे.

## डॉ.सारिका क्षीरसागरांनी मांडला शहर विकासाचा रोड मॅप

पाठवण्याची मागणी केली. पाणी पुरवठा सुधारण्यासाठी धानोरा रोड मार्गे अमृतअटल योजना २.० अंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यासोबतच इदगाह पाण्याच्या टाकीजवळील गळती दुरुस्ती, हद्दवाढ भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, पाइपलाइन नसलेल्या ठिकाणी बोअरवेल घेणे व नगरपरिषद इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करण्याचा मुद्दा मांडण्यात आला. तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत कँकालेश्वर, खंडेश्वरी देवी, राममंदिर, कोरडे गणपती, सोमेश्वर, दक्षिणमुखी हनुमान व विश्वेश्वर मंदिरासह विविध धार्मिक स्थळांच्या विकासाचे प्रस्ताव ठेवण्यात आले. बांधकाम व नगररचना विभागांतर्गत शहरातील महत्त्वाचे रस्ते, डीपी रोड, पुलांची कामे मार्गी लावणे, नवीन डीपी रोड प्रस्तावित करणे तसेच गुंठेवारी प्रक्रिया सुरू करण्याबाबत चर्चा झाली. नागरी सुविधा मजबूत करण्यासाठी महिलांसाठी सार्वजनिक शौचालये, पुरुषांसाठी मुताऱ्या, नवीन स्मशानभूमी व कब्रस्थान, भाजी मंडई व फळ मार्केट उभारणे तसेच शहराच्या पश्चिम भागात नवीन अग्निशमन केंद्र उभारण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण उद्यानाचा विस्तार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवून परिसर सुशोभिकरण, भिमसृष्टी येथे माता रमाई पुतळा उभारणी, छत्रपती संभाजी महाराज व उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे पुतळे उभारणे, बौद्ध विहार, चर्च, हज हाऊस उभारणी, फुलपाखरू उद्यान तयार करणे, शहरात ई-लायब्ररी सुरू करणे, बिंदुसरा व कर्परा नदी सुशोभिकरणासाठी डीपीआर तयार करून शासनाकडे पाठवणे तसेच तारांगण प्रकल्प सुरू करण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले. नगरपरिषदेच्या मालकीच्या इमारतींच्या भाडे पुनर्रचनेद्वारे उत्पन्न वाढवण्याचा मुद्दा मांडण्यात आला, तर स्वच्छता विभागासाठी नवीन जेसीबी, कॉम्पॅक्टर, घंटागाड्या व ट्रॅक्टर खरेदी, प्लास्टिक मुक्ती अभियान, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड व नवीन उद्याने विकसित करण्यावर भर देण्यात आला. हद्दवाढ भागात आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यासोबतच शहरातील अनाधिकृत बॅनर व होर्डिंग्जवर कारवाई करण्याची मागणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी केली. यावेळी उपमुख्याधिकारी यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

डॉ.सारिका क्षीरसागर बनल्या बीडकरांचा आवाज

स्थायी समितीच्या पहिल्याच बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागनिहाय मांडण्यात आलेल्या प्रस्तावांमुळे आगामी काळात बीड शहराच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, डॉ.सारिका क्षीरसागर या सातत्याने शहरवासीयांच्या समस्यांवर आवाज उठवत असून प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन प्रश्न सोडवित आहेत. यावरून त्या बीडकरांचा आवाज बनल्याचे चित्र दिसून येत आहे.

पान ६ वरून

## इंदुबाई पौळ यांचे निधन

त्याच्या पश्चात दोन मुले, तिन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. माजलगाव येथील छायाचित्रकार दिपक पौळ यांच्या त्या आई होत.

## पंचायत समिती माजलगावचा घरकुल विभाग ऑपरेटरच्या ताब्यात?

विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे. अशी ठाम मागणी करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी पंचायत समिती समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशाराआझाद क्रांती सेनेचे तालुकाप्रमुख अशोक ढगे यांच्याकडून देण्यात आलेला आहे. जो लाभधारकांचा पाढा जो आहे. आणि संगणमत करून कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कशा पद्धतीने थैमान घातलेला आहे. कशा पद्धतीने मी करेल तोच कायदा असं निर्बंध पाच वर्षापासून या लोकांनी मांडलेला असून, त्यांचा कोणी वाली आहे का नाही? त्यांना कोण सहज येतंय याचं विचारण्याचे धाडस कोणी करत नाही. म्हणून ज्यांचे घरकुल विविध कारणांनी रोखले गेले आहे. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे. किंवा त्यांची अडवणूक केली जात आहे. अशा सर्व लाभार्थ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, तसेच आजाद क्रांती सेनेची संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आलेले आहे.

## आष्टी तालुक्यात युरिया खताची टंचाई चढ्या दराने विक्रीने शेतकरी हतबल

शेतकरी विचारत आहेत. युरियाच्या टंचाईमागे केवळ स्थानिक व्यापारीच नाहीत, तर काही धोरणात्मक आणि तांत्रिक कारणेही चर्चेत आहेत. केंद्र सरकार युरियावर मोठी सबसिडी देते. युरियाची मूळ किंमत जास्त असली तरी शेतकऱ्यांना ती कमी दरात उपलब्ध करून दिली जाते. मात्र, काही वेळा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या मालाच्या किमती वाढल्यामुळे पुरवठा साखळीवर परिणाम होतो. केंद्र सरकार आता दाणेदार युरियाऐवजी 'नॅनो युरिया' (लिक्विड) वापरण्यावर भर देत आहे. यामुळे दाणेदार युरियाचे उत्पादन किंवा पुरवठ्यात कपात होण्याची शक्यता वर्तवली जाते. अनेकदा कंपन्यांकडून पुरेसा साठा येऊनही, अधिक नफ्यासाठी स्थानिक स्तरावर साठेबाजी केली जाते. खत केवळ शेतीसाठी न वापरता औद्योगिक कारणांसाठी वळवले जाण्याचे प्रकारही टंचाईला कारणीभूत ठरतात.

## पत्रकारांचा स्तूत्य उपक्रम...!

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड आगारातून बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर, बीड- ईट- पिंपळनेर- नाथापूर- रांजणगाव, बीड-ईट-आडगाव आदी ग्रामीण भागात धावणाऱ्या अनेक एसटी बसेसना स्पष्ट बोर्ड नसल्याने प्रवाशांना वारंवार एसटी बस चालक व वाहकांना विचारणा करावी लागत असे. यामुळे एसटी बस चालक- वाहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच अनेकदा बोर्ड नसल्यामुळे बस जवळून गेली तरी प्रवाशांना ती ओळखता येत नव्हती. ही बाब पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारासाठी नवीन डिजिटल पाट्या तयार करून बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी या पाट्या बीड आगाराच्या वाहतूक नियंत्रक श्रीमती आयेशा शेख व वाहतूक नियंत्रक महेश भावसार यांच्याकडे सुपूर्त केल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, संपादक तथा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळकर, पत्रकार प्रज्वल सिरसाट, सातपुते तसेच एसटी आगारातील कर्मचारी, बस चालक, वाहक आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना बस ओळखणे सोपे होणार असून शिवप्रसाद सिरसाट यांच्या या स्तूत्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

## तलवाडयात श्री शिवमहापुराण कथा

यांच्या अमृततुल्य वाणीतून शिवमहापुराण कथा दररोज रात्री ८ ते ११ यावेळेत मोठया उत्साहात सुरू आहे. शिवलिलामृत पारायणाचे वाचन हभप गणेश महाराज कचरे हे करत आहेत. तरी भाविक-भक्तांनी श्री शिवमहापुराण कथा श्रवणचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संकटेश्वर तरूण मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कॉपीमुक्त अभियान राबविणाऱ्या शिक्षण

परवानगी नसल्याचा आरोप होत आहे. बोर्ड परीक्षा आयोजित करण्यासाठी तब्बल १२० शालेय विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली, यामुळे शिक्षण व्यवस्थेचा गंभीर गैरवापर झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे परीक्षा केंद्र बदलल्याची माहिती जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाला नव्हती. शिक्षण विभागाचे अधिकारी गिरी यांनी याबाबत अज्ञान व्यक्त केल्याने प्रशासकीय हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा उघड झाला आहे. नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाला स्वतःची अधिकृत इमारत नसून, रहिवासी इमारतीवर कॉलेजचा फलक लावण्यात आला आहे. केवळ दोन शटर असलेल्या खोलीला कॉलेज कार्यालय म्हणून दाखवण्यात आले आहे. शहरात कॉलेज व परीक्षा केंद्र दाखवून ग्रामीण भागात परीक्षा आयोजित करणे हा गंभीर नियमभंग असल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणात संबंधित महाविद्यालयाचे जबाबदार यांच्यावर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. दरम्यान यापूर्वी बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) गैरव्यवहार प्रकरणात निलंबित झाले असून, विद्यमान शिक्षणाधिकारी (प्राथमिक) थकीत वेतन घोटाळ्यात सहआरोपी म्हणून जामिनावर आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याविरोधात विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी सुरू आहे. त्यामुळे भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा करणाऱ्या शिक्षण विभागाचा कारभार 'दिव्याखाली अंधार' असल्याची तीव्र प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ पान -३

## चारचाकीने धडक दिल्याने ऊसतोड मजुराचा जागीच मृत्यू

बीड दि ११(प्रतिनिधी) चारचाकी वाहनाने ट्रॅक्टरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने ट्रॅक्टरमध्ये बसलेला ऊसतोड मजूर रस्त्यावर पडला तसे त्याच्या डोक्यावरून वाहनाचे टायर गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अशी घटना धुळे सोलापूर महामार्गावर बीड पासून जवळ असलेल्या कोळवाडी नजीक मंगळवार रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. तर धडकेनंतर एम एच १३ डीजी ३३५५ हीचारचाकी रस्त्याच्या कडेला खड्ड्यात जाऊन आढळली असून वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच बीड ग्रामीण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलीस हेडकॉन्स्टेबल सानप यांनी पंचनामा करून मृतदेह पुढील तपासणीसाठी बीड येथील शासकीय रुग्णालयात पाठवला. ऊस तोडीचा हंगाम संपत असल्याने ऊसतोड मजुर आपल्या गावाकडे परतत असून मजुराचा असा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# धानोरा रोडचे युद्धपातळीवर काम सुरू; रहदारीला अडथळा येऊनही रस्ता चांगला होऊ लागल्याने नागरिक समाधानी

बीड दि ११(प्रतिनिधी)- गेल्या अनेक वर्षापासून ३-१३ वाजलेल्या बीड शहरातील धानोरा रस्त्याच्या प्रश्नावर अनेकांनी आंदोलने केली. परंतु लक्ष दिले जात नव्हते असे असतानाच या रस्ता कामासाठी उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री स्व.अजित दादा पवार यांनी बजेट मंजूर केल्याने रस्ता कामाला सुरुवात झाली. मध्यंतरी महिना पंधरा दिवसाचे काम बंद पडले परंतु आता युद्ध पातळीवर काम सुरू असल्याने रहदारीला अडथळा येऊन देखील रस्ता चांगला होऊ लागल्याने या रस्ता परिसरातील नागरिकासह धानोरा ,पालवन आदी ग्रामीण भागातील ग्रामस्थांनी आता आपल्याला पक्का रस्ता होणार म्हणून समाधान व्यक्त करणे चालवले. नगर रोड येथून पोलीस मुख्यालयाच्या बाजूने संत नामदेव नगर आदी भागातून जाणाऱ्या धानोरा नामक मोठ्या रस्त्याचे गेले अनेक वर्षापासून तीन तेरा वाजले होते. पावसाळ्यात खड्ड्यातील पाण्याने आणि हिवाळ्यात व उन्हाळ्यात उडणाऱ्या धुळीमुळे नागरिक व विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या रस्त्याच्या कामासाठी तरुण वर्ग पुढे सरसावला. पक्ष संघटनेच्या माध्यमातून सतत आंदोलने होत गेली. तेव्हा या रस्त्याच्या कामाकडे प्रशासनाचे लक्ष लागले परंतु तांत्रिक अडचणी दाखवत काम रखडले होते. यातच पालकमंत्री स्व. अजितदादा पवार हे बीड रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनासाठी आल्यानंतर त्यांच्या कानावर या रस्त्याचा प्रश्न गेला आणि काही दिवसातच



रस्त्यासाठी बजेट मंजूर केले. शेवटी रस्त्याचे काम सुरू झाले. परंतु सदरच्या रस्त्याच्या कामासंदर्भात आपल्यामुळेच काम सुरू झाले असे राजकारण करण्याचा प्रकार होऊ लागल्याने पंधरा-वीस दिवस काम बंद पडले होते .शेवटी पोलीस मुख्यालय ते महाराणा प्रताप चौक ईथ पर्यंत या रस्त्याचे सिमेंट डांबरीकरण झाले . पुढील कामाची सुरुवात झाली असतानाच जोगदंड नामक व्यक्तीने हे रस्ता काम अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याची समजूत घातल्याने पुढील काम आता युद्ध पातळीवर सुरू आहे . रस्ता खोदकामाच्या दोन्ही बाजूने रस्ता असल्याने अनंत अडचणींना तोंड देत नागरिक आपली वाहने त्या बाजूने नेता आहेत. दुचाकी चालवताना स्वार पडण्याच्या घटना देखील घडत आहेत. परंतु सदर रस्ता पक्का रस्ता होऊ लागल्याने नागरिक वाहतुकीची झळ सहन करत कामाबाबत समाधान व्यक्त करीत आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे कोणत्याही रस्त्याचे काम असो, त्या कामावर पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांची नजर असते. सदरचे काम कशाप्रकारे चुकीचे होत आहे, यासंदर्भात पत्रकबाजी व पेपर बाजीचे प्रकार देखील घडतात. परंतु या युद्ध पातळीवर सुरू असलेल्या धानोरा रस्त्याच्या कामासंदर्भात मात्र सदर काम निकृष्ट आहे की कसे ? यासंदर्भात कोणीही अद्याप बोललेले नाही .विशेष म्हणजे सुरुवातीपासून या रस्त्याच्या कामासाठी ज्या वंचित बहुजन आघाडीच्या नेत्याने व या परिसरातील कार्यकर्ते व माजी नगरसेवकांनी आंदोलने केली होती त्यांनी देखील या रस्त्याचे काम चांगले की वाईट यासंदर्भात अद्याप मत व्यक्त केले नाही, पत्रक वाजी तर लांबच. यामुळे काम कसेही होवो पण रस्ता होत आहे यासंदर्भात नागरिक समाधानी असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे या रस्त्याचे काम होत असताना संबंधित गुत्तेदार स्वतः उभे असल्याचे नागरिकांचे म्हणणे येत आहे.

## भारतीय किसान संघाच्या २३ च्या मोर्चात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे -आप्पाराव यादव



अंबाजोगाई दि ११ (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी भारतीय किसान संघाच्या वतीने भारतीय किसान संघाचे महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळीराम सोळुंके यांच्या नेतृत्वाखाली २३ फेब्रुवारी रोजी जिल्हा कचेरीवर शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार आहे या मोर्चा बहुसंख्येने शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आप्पाराव यादव यांनी केले आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात यादव यांनी पुढे म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या संदर्भात वारंवार विनंती करूनही समस्या सुटत नसल्याने बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग संतप्त झाला असून, त्यांनी पी एम व सीएम सन्मान निधीत दुप्पट वाढ करावी, सन २०२५ मध्ये खरीप हंगामात जाहीर केलेला १७,५०० रुपयांचा विमा त्वरित द्यावा, खेड्यातील पांदण रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करून येत्या खरीप हंगामापूर्वी पूर्ण करावीत, २०२५ च्या अतिवृष्टीने जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्डेमय झाले ते तात्काळ बुजविण्यात यावेत. अश विविध मागण्या भारतीय किसान संघाने केल्या असून या मागण्या २२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सोडविण्यात याव्यात अन्यथा नाईलाजाने २३ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या कार्यालयावर भारतीय किसान संघ जिल्हा शाखा बीड च्या वतीने मोर्चा काढण्यात येईल तेव्हा या मोर्चात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे .या निवेदनावर भारतीय किसान संघाचे पदाधिकारी तुकाराम चोपडे, बाळासाहेबभोजने, प्रकाश कुलकर्णी, अशोक तौर, भीमराव शिंदे, ज्ञानेश्वर घोलप, काशिनाथ आदमोरे, अशोक मस्के, भास्कर आगे, गोवर्धन कर्डिले, साधू जाधव, सौ. प्रेमाताई यादव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राज्यसरकारी कर्मचाऱ्यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा

बीड दि ११( प्रतिनिधी)- केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना दि. जुलै २०२५ पासून लागू झालेला ३ टक्के वाढीव महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक-प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्वरित लागू करावा असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व संबंधीतांकडे केली आसल्याची माहिती मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य बंडू अघाव यांनी दिली आहे.

याबाबत अघाव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, बाजारात होत असलेली प्रचंड महागाई वाढ लक्षात घेऊन केंद्र शासनाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना दि.१ जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. त्यांच्या महागाई भत्ता ५५ते ५८ टक्क्यांवर गेला आहे. तर राज्यातील कर्मचारी व शिक्षकांना अद्याप ५५ टक्केच महागाई भत्ता मिळत आहे. केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करून आज जवळपास सात महिने झाले आहेत. तरी राज्यशासनाकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात वाढ करण्याची हालचाल दिसून येत नाही. केंद्रा प्रमाणे वेतन व भत्ते देण्याचे राज्यसरकारचे सुत्र आसून केंद्राने त्यांच्या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते लागू केले की राज्य सुध्दा त्यांच्या कर्मचाऱ्यांना दोन महिन्याच्या आत त्याची अंमलबजावणी करत असते. परंतू सदरील ३ टक्के वाढीव महागाई भत्ता सात महिने होऊन गेले तरी तो अद्याप पर्यंत लागू केला गेला नाही. म्हणून कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत आहे. तरी राज्यसरकारने या मागणीची तात्काळ दखल घेऊन राज्यातील राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षक-प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने १ जुलै २०२५ पासून लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधीतांकडे प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## स्नेहसंमेलन म्हणजे कलागुणांचा आविष्कार-डॉ.अविनाश देशपांडे

बीड दि ११ (प्रतिनिधी)- अभ्यासा बरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना साद घालणारे व्यासपीठ म्हणजे स्नेहसंमेलन असते. यातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा अविष्कार समोर येतो असे प्रतिपादन सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडें यांनी केले.

येथील सावरकर महाविद्यालयात आयोजित सावरकर महोत्सव अर्थात स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे हे होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. छत्रपती पांगारकर, सहप्रमुख डॉ गंगाधर उषमवार यांची उपस्थिती होती. डॉ. अविना देशपांडे म्हणाले की स्नेहसंमेलनातूनच पुढे वेगवेगळ्या क्षेत्रातील कलाकार निर्माण होतात. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील हा अवस्मरणीयय काळ असतो. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये उज्वल यश संपादन केले आहे. त्यांच्या कौतुकाचा हा क्षण आहे. अध्यक्षीय समारोपात प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले की सावरकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत उज्वल यश संपादन केले आहे. यापुढेही त्यांनी यशाचा आलेख असाच उंचावत ठेवावा. प्रास्ताविक डॉ. छत्रपती पांगरकर यांनी केले. आभार डॉ गंगाधर उषमवार यांनी मानले. उद्घाटन सत्रा नंतर आनंदनगरी, शेलापागोटेचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

## येवता येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी

केज दि ११ (प्रतिनिधी) - तालुक्यातील मौजे येवता येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची १२८ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि धम्ममय वातावरणात बौद्ध विहारात साजरी करण्यात आली.

यावेळी गावातील नागरिक, महिला आणि तरुण मंडळाने एकत्र येत माता रमाईंच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. माता रमाईंच्या त्यागाला अभिवादन कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. या वेळी उपस्थितांनी माता रमाईंच्या जीवनावर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वरत्न होण्यामागे माता रमाई यांचा मोठा त्याग होता. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही त्यांनी धिर न खचता बाबासाहेबांना साथ दिली, असे विचार यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी लिंबराज गायकवाड वंचित बहुजन आघाडी, सुरज काळे रिपाई आय टी सेल ता. अध्यक्ष व धम्म बांधव, महिला बालासाहेब गायकवाड, संजय गायकवाड, राहुल काळे, वचिष्ट साळवे, सचिन गायकवाड माजी ग्राम पंचायत सदस्य, विनोद काळे, सिद्धार्थ काळे, रोहित गायकवाड, वैभव जाधव, पृथ्वीराज गायकवाड व इतर ग्रामस्थ महिलांचा मोठा सहभाग लाभला.

यावेळी भीमशक्ती बचतगटाच्या अध्यक्षा. रजनी गायकवाड, सुरेखा गायकवाड, एकल महिला संघटनेच्या रतन गायकवाड व इतर उपासिका मंदाकिनी गायकवाड, वंदना गायकवाड, सिमा काळे, निकीता काळे यांच्यासह गावातील उपासक. उपासिका व इतर प्रतिष्ठित नागरिक आणि लहान-थोर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## पुस्तक प्रकाशनाला उपस्थित रहावे ;अश्विन भोंडवेचे आवाहन

बीड दि ११(प्रतिनिधी)- गेल्या ३९ वर्षांपासून सोनदरा गुरुकुल मराठवाड्यातील ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांच्या मुलांसाठी सुसंस्कारित व दर्जेदार निवासी शिक्षण देण्याचे काम करत आहे. भारतरत्न नानाजी देशमुखांच्या प्रेरणेतून सुदामकाका भोंडवे यांनी या गुरुकुलाची स्थापना केली. पत्नी सिंधूमामींसह त्यांनी विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी स्वतःला वाहून घेतले.

कोविडसाथीच्या काळात त्यांनी गुरुकुलाची वाटचाल, आलेले अनुभव, विविध विषयांवरील चिंतन मांडणारे लेख लिहिले होते. फेब्रुवारी २०२३ मध्ये त्यांच्या झालेल्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर या लेखांचे पुस्तक करण्याचे ठरले. मराठी साहित्य विश्वातील प्रतिष्ठित व लोकप्रिय प्रकाशन संस्था राजहंस प्रकाशन हे पुस्तक प्रकाशित करत आहे. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यातील टाटा सभागृह, बी.एम.सी.सी. येथे होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्यानिमित्त एक शैक्षणिक परिसंवाद आणि सोनदरा गुरुकुलाची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन दीनदयाल नवरचना प्रतिष्ठान, सोनदरा गुरुकुल, डोमरीचे सचिव अश्विन भोंडवे यांनी मेलवर टाकलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे

# परीक्षा काळात वीज पुरवठा खंडित होऊ नये म्हणून महावितरणचे कर्मचारी दक्ष

बीड, दि. ११(प्रतिनिधी)- इयत्ता बारावी व दहावी परिक्षेच्या कालावधीत परिक्षा केंद्रावर वीज पुरवठयात कुठलाही व्यत्यय येवू नये व सर्व परिक्षा सुरळीत पार पडावी यासाठी जिल्हयातील सर्व भागात अखंडित वीज पुरवठा करण्याचे कडक निर्देश महावितरणच्या प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांनी महावितरणचे मुख्य अभियंते, अधिक्षक अभियंते व संबंधीत विभागातील कार्यकारी अभियंते यांना दिले त्यानुसार महावितरणचे अधिकारी कर्मचारी कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.. राज्यात बारावी आणि दहावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्य घडवण्यात त्यांचे महत्त्व लक्षात घेता, परीक्षेच्या वेळेत वीजपुरवठ्यात कोणताही व्यत्यय आल्यास परीक्षांच्या आयोजनावर गंभीर परिणाम होऊ शकतो. बारावी आणि दहावीच्या बोर्ड परीक्षा काटेकोर वेळापत्रकानुसार आणि देखरेखीखाली घेतल्या जातात आणि संपूर्ण परीक्षेच्या कालावधीत सुरळीत वीजपुरवठा राहणे आवश्यक आहे. यासाठी परीक्षेच्या वेळेत कोणतेही देखभाल दुरूस्तीचे नियोजित कामे केली जाणार नाहीत. तसेच वीज बंद बाबतचे निवेदन देवून वीज पुरवठा बंद केला जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. वीज पुरवठा सुरळित ठेवण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी जलद प्रतिसाद पथके तयार ठेवावीत, आवश्यक तांत्रिक साहित्याची उपलब्धता करून ठेवावी. परिक्षा केंद्रावर वीज पुरवठयात व्यत्यय आल्यास, तांत्रिक दोष आढळून आल्यास व वीज पुरवठा दुरूस्तीकरिता निष्काळजीपणा केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करण्याचा इशाराही सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने (भाप्रसे) यांनी दिला त्यानुसार बीड शहर असो जिल्ह्यात परीक्षा सेंटरचा वीजपुरवठा कायम राहावा यासाठी तेथील कर्मचारी दक्ष असल्याचे महावितरणच्या एका कर्मचाऱ्याकडून समजले.

## पाटोदा पं.स.ची नवी इमारत धूळखात पडून विद्युतीकरण रखडल्याने हस्तांतरण लांबणीवर

पाटोदा दि ११ (अ कादर मकरानी)- पाटोदा पंचायत समितीची नवीन इमारतीसाठी जवळपास चार कोटी रुपये खर्च करूनअति भव्य अशी इमारत बांधली मात्र विद्युतीकरण रखडल्याने हस्तांतरण लांबणीवर पडले असून सध्या जुन्या इमारतीतूनच पंचायत समितीचा कारभार चालू आहे त्वरित विद्युतीकरण करून नव्या इमारतीत पंचायत समितीचा शुभारंभ करावा अशी जनतेतून मागणी होत आहे



तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांनी विशेष बाब म्हणून मंजूर केलेल्या निधीतून पाटोदा पंचायत समितीची भव्य इमारत उभी राहिली आहे मात्र प्रशासकीय अनास्था आणि नियोजनाच्या अभावामुळे ही इमारत गेल्या दोन-तीन वर्षांपासून धूळखात पडून आहे. जवळपास चार कोटी रुपये खर्चूनही केवळ वीज पुरवठ्याचे काम अपूर्ण असल्याने तालुक्याच्या विकासासंदर्भात अति महत्त्वाचे असलेले पंचायत समिती कार्यालयाचा कारभार जुन्याच इमारतीतून चालत आह.या इमारतीसाठी जवळपास चार कोटी रुपयांची इमारतीचे बांधकाम आणि विद्युतीकरणाची कामे पाच वर्षांच्या मुदतीत पूर्ण करणे अपेक्षित होते. इमारतीचे सिमेंट-कॉंक्रिटचे काम पूर्ण झाले असले, तरी तांत्रिक कारणांमुळे वीज पुरवठ्याचे काम रखडले. दरम्यानच्या काळात टेंडरची मुदत संपल्याने आता या कामासाठी पुन्हा नवीन निविदा प्रक्रिया राबवण्याची वेळ जिल्हा परिषद बांधकाम विभागावर आली आहे. बांधकाम विभागाने दावा केला आहे की, इमारतीचे काम पूर्ण झाल्याने ती पंचायत समितीकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. मात्र, दुसरीकडे विद्युतीकरण पूर्ण झाल्याशिवाय इमारत ताब्यात घेणार नसल्याची भूमिका पंचायत समिती प्रशासनाने घेतली आहे. काम पूर्ण झाल्यावरच इमारत ताब्यात घेतली जाईल, असे गटविकास अधिकारी उद्धव सानप यांनी स्पष्ट केल्याने, या कागदोपत्री हस्तांतरणावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.इमारत उभी राहून दोन-तीन वर्षे उलटली तरी स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी किंवा कार्यकर्त्यांनी या समस्येकडे लक्ष दिलेले नाही. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही जनतेच्या सुविधेसाठी ही इमारत उपलब्ध होत नसल्याने पाटोदा तालुक्यातील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. केवळ वीज नसल्याच्या कारणावरून ही देखणी वास्तू ओसाड पडून राहणे, हा सरकारी पैशांचा अपव्यय असल्याची भावना व्यक्त होत आहे



बीड - तालुक्यातील यशवंत विद्यालय कुर्ला येथे माजी विद्यार्थिनी अश्विनी धर्मराज गूंड हिने हॉटेल मॅनेजमेंट पूर्ण करून भविष्यात परदेशात जाणार असल्याने तिचा सत्कार करून शुभेच्छा देताना मुख्याध्यापक अभिषेक राऊत, पर्यवेक्षक जामकर दत्ता व शिक्षकेतर कर्मचारी

## महिलांच्या खुल्या गीत गायन करा ओके स्पर्धेचे बीडमध्ये आयोजन

बीड दि ११ (प्रतिनिधी)- बीड शहरातील कलाकार ग्रुप यांच्या वतीने महिलांसाठी खुल्या गीत गायन करा ओके स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी बाबासाहेब आंबेडकर भवन, हॉल, नगर रोड, बीड येथे दुपारी १२.०० ते सायं. ५.०० या वेळेत संपन्न होणार आहे.या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक रोख पारितोषिके व सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक: रु. ५०००/- व सन्मानचिन्ह (आर्यन ट्रेडर्सचे प्रो. प्रा. अमोल बागलाने यांच्या वतीने),द्वितीय पारितोषिक: रु. ३०००/- व सन्मानचिन्ह (रोख, अथर उर्फ बब्बु यांच्या वतीने), तृतीय पारितोषिक: रु. २०००/- व सन्मानचिन्ह (श्री. बबनराव वडमारे यांच्या वतीने) उत्तेजनार्थ पारितोषिके: प्रत्येकी रु. १०००/- व सन्मानचिन्ह (एकूण ३ पारितोषिके) - राजाभाऊ गुजर, नगरसेवक, बोड यांच्या वतीने स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या इच्छुक महिलांनी आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रवेश शुल्क रु. ५००/- संयोजक ॲड. अविनाश गडगे (मो. नं. ९४२२२४४५१०) यांच्याकडे ऑनलाईन जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या स्पर्धेचे संयोजक बबनराव वडमारे, मॅथ्यु जोसफ, विराज प्रकाश, कैलास थोरात, नइम इनामदार, डॉ. सुधिर साळवी व जनार्धन वडमारे यांनी अधिकाधिक महिलांनी सहभाग नोंदवून स्पर्धा यशस्वी करावी, असे आवाहन केले आहे. स्पर्धा समाप्तीनंतर त्याच ठिकाणी त्वरित बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे.

## ॲड.अपेक्षा दळवी निवडणुकीत



बीड दि ११(प्रतिनिधी)- अन्याया विरुध्द सातत्याने लढाणाऱ्या, सामाजिक चळवळीतील कार्यतत्पर वकील ऍडव्होकेट अपेक्षाताई दळवी या निडणुकीत महिला राखीव मधून उभ्या राहिल्या आहेत. तरी महिला राखीव मधील पहिल्या पसंतीचे आपले बहुमूल्य मत अपेक्षाताई दळवी यांना देऊन प्रचंड बहुमताने महाराष्ट्र व गोवा परिसरातील तमाम वकील बांधवानी विजयी करावे. असे आवाहन पत्रकातून करण्यात आले आहे.

### महापशुधन एक्सपोला शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे -आवाहन

बीड- ( प्रतिनिधी ) - पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकाराने दि. १३ ते १५ फेब्रुवारीपर्यंत परळी येथे होत असलेल्या महा पशुधन एक्सपो प्रदर्शनाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना व पशुपालकांसाठी संधी ठरणार आहे. किंवा या महा पशुधन एक्सपोला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाच्या पदाधिकारी मंडळी कडून करण्यात येत आहे.

# पाच लाख क्विंटल शेतमालाची एक ते अडीच हजार रुपये कमी दरात खरेदी

केज दि ११ (प्रतिनिधी) जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या २०२५च्या खरीप, रब्बी हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, बाजरी, गहु, ज्वारी आदी प्रकारच्या सुमारे पाच लाख क्विंटल शेतमाला ची १ हजार ते २ हजार ५०० रुपये कमी दरात खरेदी बीड जिल्ह्यातील सर्वच कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या आवारात करण्यात आली असुन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, शेकाप चे जिल्हा संघटक धनंजय मूळे, शेतकरी नेते राजेंद्र वीर, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड शहराध्यक्ष श्रीकृष्ण कोलंगडे, महिला आघाडीच्या नयना भाकरे यांनी सदर नुकसान भरपाई देण्यासाठी जबाबदारी निश्चित करावी तसेच कमी दर देणाऱ्या मार्केट कमिटीच्या अंतर्गत शेतमाल खरेदी-विक्री परवान्यांचे नूतनीकरण स्थगित करण्याची मागणी जिल्हाधिकारी, जिल्हा उप निबंधक, जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी केली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, जिल्हा उपनिबंधक, मार्केट कमिटीचे सचिव, कृषि पणन मंडळाचे जिल्हा मार्केटिंग अधिकारी, शेतकरीसंघटना प्रतिनिधी यांच्यात दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली होती.या बैठकीत कलम ३२ (ड) प्रमाणे किमान आधारभूत किंमत न देणाऱ्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या यार्डा तील खरेदीदारा विरुद्ध कार्यवाही करण्याचे ठराव मंजूर केले होते. मात्र मार्केट कमिटीच्या सचिवांनी जाणीवपूर्वक कोणावरही कार्यवाही केली नाही. आढावा बैठकीत जिल्ह्यातील मार्केट कमिटींच्या सचिवांनी सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी, ज्वारी, गहू आदी प्रकारचा सुमारे पाच लक्ष क्विंटलशेतमाल बाजार समिती आवारात लिलावाद्वारे खरेदी करण्यात आला असून त्याची मार्केट फिस वसुल केल्याचे मान्य केले आहे. ज्या शेतमालाची मार्केट फीस वसूल केली जाते. त्या शेतमालाला केंद्र शासनाकडून निर्धारित केलेले किमान आधारभूत दर देणे क्रमप्राप्त आहे. सुमारे ५ लाख क्विंटल शेतमालाला १हजार ते २ हजार ५०० रुपयापर्यंत कमी दर देणाऱ्या खरेदीदारा विरुद्ध शेतकऱ्यांना विना विलंब तात्काळ नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी निश्चित करावी तसेच २०२६ साठी मार्केट कमिटीकडे शेतमाल खरेदी-विक्री परवान्यांचे नूतनीकरणासाठी येणारे प्रस्ताव स्थगित करावेत. अशी निवेदनाद्वारे मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, शेकापचे जिल्हा संघटक धनंजय मुळे, शेतकरी नेते राजेंद्र वीर, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड शहराध्यक्ष श्रीकृष्ण कोलंगडे, महिला आघाडीच्या नयना भाकरे यांनी जिल्हाधिकारी बीड, जिल्हा उपनिबंधक, बीड, जिल्हा मार्केटिंग अधिकारी, कृषि पणन मंडळ, बीड यांना केली आहे.

# संपादकीय

## उत्क्रांतीवादाचा जनक चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

# पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करा – पप्पू गायकवाड

गेवराई दि.११ (प्रतिनिधी) - गेवराईच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सावळा गोंधळ सुरु असून गोरगरीब लोक हवे तेवढे पैसे देत नसल्यास त्यांना खेट्या मारायला लावून मानसिक व आर्थिक छळ करून पिळवणूक केली जात आहे. निवडक खाजगी दलालांमार्फत आलेल्या खोट्या दस्ताला खरे ठरवत शासनाचा कोट्यावधी रुपयाचा मुद्रांक शुल्क बुडवण्याचे काम दुय्यम निबंधक, गेवराई तहसीलचे नगर रचनाकार, तलाठी व इतर काही कर्मचारी करत आहेत. त्यांची समिती मार्फत चौकशी करून त्यांच्याविरोधात कठोर कार्यवाही करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा लेखी निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष अजयकुमार उर्फ पप्पू गायकवाड यांनी दिला आहे.दुय्यम निबंधक कार्यालयात अनेक वर्षांपासून काही दलालांमार्फत बोगस दस्त तयार करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडवला जात आहेत. अनेक दिवस पाठपुरावा केल्यानंतर काही पुरावे हाती लागले आहे. त्यातील खरेदीखत दस्त क्र.६७३५/२०२५ व ३७३५/२०२५ च्या सत्य प्रती दुय्यम निबंधक कार्यालयातून प्राप्त करुन त्याबद्दल माहिती काढली असता सदरचे दस्त हे मौजे गेवराई येथील सर्वे नं.७९ मधील असून सदरची मालमत्ता हि गेवराई नगरपरिषदेच्या हद्दीतील नसतांना नगरपरिषद हद्दीत दाखवले आहे. सदरच्या सर्वे नं.७९ ला मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून गुंठेवारी प्रमाणपत्र नसतांना तहसीलचे नगर रचनाकार कार्यालयाने बोगस अकृषी प्रमाणपत्र दाखवत नगर रचनाकारचे ले ऑउट नसतांना सदरचे दस्त नोंदणी केली आहे. तसेच नगरपरिषद हद्दीतील जागेचे मुल्यांकन जास्तीचे असतांना कमी मुल्यांकन दाखवत शासनाचा कोट्यावधी रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडवत शासनाची देखील फसवणूक केली आहे. गेवराईचे दुय्यम निबंधक कार्यालयाने सन २०२३ ते २०२५ या कालावधीत बनावट दस्त नोंदणी करून असाच गैरप्रकार करुन शासनाचा मुद्रांक शुल्क बुडवून शासनाची अर्थीक फसवणूक केल्याप्रकरणी दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्यात आले होते. तसेच सदरचे बोगस दस्ताअधारे खरेदीखत, बक्षीस पत्र, गहाणखत, ७/१२, पीटीआर व सबंधित व्यक्ती हजर नसतांना त्यांच्या बनावट सह्या करून इंडिया फायनान्स कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीने बोगस दस्ताच्याअधारे विविध प्रकारचे करोडो रुपयांचे कर्ज मंजूर करत आहेत. तरी सदरच्या प्रकरणाची उच्चस्तरीय समिती स्थापन करुन चौकशी करावी आणि संबंधित दोषींवर कठोर कार्यवाही करावी अन्यथा १५ दिवसानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने वंचित बहुजन आघाडी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा जिल्हाधिकारी बीड यांना वंचित बहुजन आघाडी चे गेवराई तालुकाध्यक्ष अजयकुमार पप्पू गायकवाड यांनी दिला आहे.

## चंपावती महोत्सवात जिजामाता प्राथमिक विद्यालयाचे सुयश

बीड दि.११(प्रतिनिधी)- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने यावर्षीही आयोजित केलेल्या चंपावती महोत्सवात जिजामाता प्राथमिक विद्यालयाने घवघवीत यश मिळवले.

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे हा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये नृत्य, नाट्य, संगीत, चित्र अशा विविध कलांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये जिल्हा भरातील शेकडो शाळांनी सहभाग नोंदवला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने यावर्षीही आयोजित केलेल्या



चंपावती महोत्सवात जिजामाता प्राथमिक विद्यालयाने घवघवीत यश मिळवले.

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे हा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये नृत्य, नाट्य, संगीत, चित्र अशा विविध कलांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये जिल्हा भरातील शेकडो शाळांनी सहभाग नोंदवला. यातच या महोत्सवात कॅनॉल रोड येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी सहभाग घेतला. चौथी ते सहावी गटामध्ये जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकावला या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिव, शाळेचे मुख्याध्यापक व शाळेतील सर्व कर्मचारी यांनी या महोत्सवातील सहभागी आपल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## शिवशारदा पब्लिक स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात




गेवराई दि.११ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील शिवाजीनगर गढी येथील सीबीएसई माध्यमाच्या नामांकित शिवशारदा पब्लिक स्कूल याठिकाणी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना भावनिक वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी शाळेचे प्राचार्य संतोषकुमार अन्नम यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक विभाग प्रमुख इरफान तारेक शेख, इयत्ता नववीचे विद्यार्थी व वर्ग शिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने या स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.. इयत्ता दहावीच्या तिन्ही वर्गांचे वर्ग शिक्षक राजेश कडेल, विजय कोकाटे व अमृता पंडित यांच्या समवेत विद्यार्थ्यांचे वर्गनिहाय वेगवेगळ्या वेशभूषेत रांगेत उभे राहून जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी नृत्य, शायरी व प्रेरणादायी भाषणांद्वारे आपले भाव व्यक्त केले. तसेच दहावीच्या काही विद्यार्थ्यांनीही आपले शालेय अनुभव सांगताना वातावरण भावूक केले. शाळेचे शिक्षक व परीक्षा विभागाचे समन्वयक सुनील चाळक यांनी कविता सादर करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक विभाग प्रमुख इरफान तारेक शेख यांचे मार्गदर्शन झाले . निरोपाच्या क्षणी इतर वर्गातील विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात बसपर्यंत साथ देत दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप दिला.

## गाथा–ज्ञानेश्वरीच्या संगतीत भरभरून आनंद व समाधान मिळते–ह.भ.प.माधव महाराज डाके

बीड दि ११(प्रतिनिधी)- माऊली ज्ञानोबारायांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ स्नेहभेट उपक्रम गुरुवार, दिनांक ६ फेब्रुवारी २०२६रोजी सायंकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला.

या उपक्रमानिमित्त संपूर्ण परिसरात भक्तीचा दरवळ पसरला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्ञानोबा-तुकोबा या नामगजरात भव्य दिंडी काढण्यात आली. यावेळी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची गाथा ग्रंथ व ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरीतील निवडक ओव्यांवर अत्यंत प्रभावी आणि सोप्या शब्दांत प्रवचन केले. आपल्या प्रवचनात त्यांनी संतसंगतीचे महत्त्व विशद करताना मनुष्याने आपल्या जीवनात नेहमी सज्जन व चांगल्या लोकांची संगत करावी. अशी संगत जीवन सुगंधित करते आणि आयुष्यात आनंद व समाधान निर्माण करते. असे सांगितले.मराठी संत साहित्य व वाङ्मय



याविषयी बोलताना महाराज म्हणाले की, ज्ञानेश्वरी हे ७०० वर्षांपूर्वी निर्माण झालेले अद्वितीय वाङ्मय असून आजही ते तितकेच सतेज, प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे. या स्नेहभेट कार्यक्रमात उपस्थित साधकांना ज्ञानेश्वरी ग्रंथासोबत संत तुकाराम महाराजांची गाथा ग्रंथ सप्रेम भेट देण्यात आली. या कार्यक्रमाला ह.भ.प. मुकुंद भुतपल्ले, तुकाराम पंत जोशी, डीसीसी बँकेचे उदय खोपटिकर, रामधन जमाले, पन्हाळकर गुरुजी, सारिका ताई पन्हाळकर, सीमा ताई , सुरेश पवार काका, रेखा डॉ. कपूर साहेब, महादेव (नाना साळुंके )वृंदावनी साळुंके यांच्यासह असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमात हभप हरिदास सोळंके महाराज ह भ प दगडू महाराज भुजबळ, वचिष्ठ नाना शेंडगे, मंचकराव सोळंके अंकुशराव पवार ,यश शिंदे, यांचाही सहभाग आणि सहकार्य लाभले आहे

## राष्ट्रीय थाय बॉक्सिंग स्पर्धेत सेंट झेवियर स्कूलची इस्रा खानने पटकाविले गोल्ड मेडल



बीड दि.११(प्रतिनिधी)- बीड येथील जालना रोड स्थित सेंट झेवियर स्कूल मधील इस्रा रोमन खान हिने राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, जिल्हा क्रीडा अधिकारी व इतर स्तरातून तिचे कौतुक होत आहे. हैदराबाद, दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय थाय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सेंट झेवियर स्कूलची इयत्ता सहावीत शिकणारी मुलगी इस्रा रोमन खान ६० किलो वजनी गटात थाई बॉक्सिंग या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक मिळविले. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य फादर जेम्स थोरात, फादर वॅलन्ट समन्वयक भाग्यश्री कैलासे शिक्षक लिजमा जोसेफ, सुषमा सरदे, सचिन बोरुडे, चंदा साबळे, संध्या वाघमारे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे तोंड भरून कौतुक केले या यशामागे मार्गदर्शक म्हणून शाळेचे क्रीडाशिक्षक सूर्यकांत शाहूराव घोलप यांनी मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयाचे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सुयश

बीड दि.११ (प्रतिनिधी)- द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम पारितोषिक मिळवले. द.बा. घुमरे पब्लिक स्कूल या विद्यालयात स्व.द.बा. घुमरे यांच्या जयंती निमित्ताने जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये आपल्या विद्यालयातील विद्यार्थी चि. फटाले समर्थ नितीन व चि. काळे प्रणव विनायक या विद्यार्थ्यांना प्रथम क्रमांकाचे बक्षीस रोख रक्कम रुपये ५०००/-, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. 'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान' या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी प्रयोगाचे उत्तम सादरीकरण केले. भविष्यात लोकांचे आयुष्य सुखकर आणि सोपे



होण्यासाठीचे अनेक घटक त्यात समाविष्ट करण्यात आले होते जसे की, solar tracker ,vertical wind ,wireless charging, automatic street light ,Dam alert, smart dustbin, disaster alert etc. प्रयोगाचे निरीक्षण करणाऱ्या निरीक्षकांनी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे भरभरून कौतुक केले आणि पुढील प्रयोगांसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक लाहोटी सर ,उपमुख्याध्यापक हावळे सर आणि पर्यवेक्षक मालपाणी सर तसेच यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका सौ. थापडे मॅडम व सर्व सहकारी शिक्षकवृंद यांनीही मुलांचे कौतुक केले.

## स्व.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त माजलगाव भाजपाच्या वतीने अभिवादन



माजलगाव दि ११ (प्रतिनिधी)-भारतीय जनता पार्टीच्या वतीने समर्पण दिन निमित्त व स्व. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले. या प्रसंगी पंडित दीनदयालजी उपाध्याय यांच्या आठवणीला उजळा देत व त्यांनी केलेल्या कार्याची मांडणी करताना भाजपा शहर सरचिटणीस पवन मोगरेकर म्हणाले अखंड मानवतावादाची विचारसरणी आणि अंत्योदयाची संकल्पना मांडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अविरतपणे समर्पण भावनेने केलेल्या कार्याची माहिती आपल्या मनोगतातून सांगितली. ते याप्रसंगी म्हणाले एकात्म मानव दर्शन या संकल्पनेतून त्यांनी समाज ,राष्ट्र आणि माणूस केंद्रस्थानी ठेवणारा विचार देशासमोर मांडला. राजकारण हे सत्तेसाठी नसून सेवेचे माध्यम असावे , समाजातील शेवटच्या घटका चा विकास हाच खरा विकास आहे हा त्यांचा मूलमंत्र होता, त्यांचे विचार साधे जीवन आणि प्रखर राष्ट्रनिष्ठा आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात असे सांगितले. या कार्यक्रमाला भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके , कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा सभापती नितीन नाईकनवरे, दीपक मुंडे , भाजप नेते प्रताप रांजवण , माजलगाव शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी, भाजप पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके , अभय होके पाटील, शरदराव कचरे , भाजपा सरचिटणीस कैलास खुरपे,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब क्षिररसागर , भाजपा उपाध्यक्ष कल्याण शेप , भाजपा चिटणीस विनोद लड्डा, भाजपा उपाध्यक्ष रामेश्वर चव्हाण , भाजपा विस्तारक रमेश शेंडगे, भाजपा चिटणीस संतोष जाधव , भाजपा शहर चिटणीस सुभाष कांबळे , शहरचिटणीस मनोज कोरडे, भाजपा सरचिटणीस पवन मोगरेकर, नारायणराव मेंडके , युवा नेते संतोषराव सोळंके ,रवी गायकवाड,, ओंकार गिरी गोविंद जांगिड , बबलू राऊत ,किशोर विभुते यांच्यासह शक्ती प्रमुख बूथ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## बीडचे कामगार अधिकारी कोणाळे सन्मानित

बीड दि ११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई आणि आंतरराष्ट्रीय न्याय अभियान. एल जे एम यांच्या संयुक्त विद्यमाने दि ८ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या परीषदेत राज्यांमधून वेठबिगार निर्मूलन क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तिन कामगार अधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई आणि आंतरराष्ट्रीय न्याय अभियान. एल जे एम यांच्या संयुक्त विद्यमाने दि ८ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या परीषदेत राज्यांमधून वेठबिगार निर्मूलन क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या तिन कामगार अधिकारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्या मध्ये बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोणाळे यांचा सत्कार पुष्पगुच्छ प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिव येथील सरकारी कामगार अधिकारी तात्याराव कराड व परभणीचे सरकारी कामगार अधिकारी संदीप हार मळकर यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या कार्यक्रमांचे अध्यक्ष मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश रविंद्रजी घुगे होते कोणाळे यांचें सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## शिवजन्मोत्सवानिमित्त १७ फेब्रुवारीला उमरीत भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन

माजलगाव दि ११(प्रतिनिधी)- तालुक्यातील उमरी येथे शिवजन्मोत्सवा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यातच १७ फेब्रुवारी रोजी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून बैलगाडा प्रेमींनी सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.तालुक्यातील उमरी येथे शिवजन्मोत्सवा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यातच १७ फेब्रुवारी रोजी भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून बैलगाडा प्रेमींनी सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकाकडून करण्यात आले आहे.शिवजन्मस्वानिमित्त भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन १७ फेब्रुवारी उमरी येथे करण्यात आले आहे . बैलगाडा शर्यती मध्ये भाग येणाऱ्या स्पर्धकाला एकूण आठ बक्षिसे दिले जाणार असून पहिले बक्षीस ३१ हजार १३१ रु. आसाराम उत्तमराव घायतिडक यांच्याकडून दिले जाणार आहेत तर दुसरे बक्षीस २१ हजार १२१ रुपये बैलगाडा शर्यत कमीटी कडुन दिले जाणार आहे. तर तिसरे बक्षीस११ हजार १११ रू महादेव माणे, मुंजाभाऊ घायतिडक चौथे बक्षीस ९ हजार ९९९ रू उध्दव पौळ,आरोही लेडीज एम्पोरियम माजलगाव पाचवे बक्षीस ७ हजार ७७७ रू ज्ञानेश्वर आसाराम घायतिडक सहावे बक्षीस ५ हजार ५५५ रू.बळीराम सुखदेव घायतिडक सातवे बक्षीस ४ हजार ४४४रू परमेश्वर ईनामकर ,आबासाहेब सोनवणे,आठवे बक्षीस ३ हजार ३३३ रू नितीन आण्णासाहेब घायतिडक इत्यादी बैलगाडा शर्यतीत सहभाग घेणाऱ्या बैलगाडा प्रेमींना बक्षीस मिळणार असून बैलगाडा शर्यती त सहभाग घ्यावा असे आवाहन बैलगाडा शर्यत कमिटी कडून करण्यात आले आहे.

## परळी येथील 'महा पशुसंवर्धन शिबिरास उपस्थित राहण्याचे डॉ.संजय नाकलगावकर यांचे आवाहन

माजलगाव दि ११ (प्रतिनिधी )-परळी येथे दिनांक १३, १४ आणि १५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'अखिल भारतीय महा पशुसंवर्धन शिबिरास' माजलगाव तालुक्यातील सर्व शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. संजय नाकलगावकर यांनी केले आहे.हे शिबिर केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून पशुपालकांसाठी ज्ञानाची मोठी शिदोरी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. पशुपालन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती, नव्या पद्धतींचे प्रात्यक्षिक तसेच व्यवसाय अधिक फायदेशीर करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन या शिबिरात उपलब्ध होणार आहे.शिबिरात नामांकित पशुवैद्यक व तज्ज्ञ उपस्थित राहून जनावरांचे आरोग्य, संतुलित आहार, लसीकरण, व्यवस्थापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच पशुसंवर्धन विभागाच्या विविध शासकीय योजना, अनुदाने, विमा योजना यांची माहिती एकाच छताखाली मिळणार आहे. जनावरांच्या विविध आजारांवरील प्रतिबंध व उपचार पद्धतींचे प्रात्यक्षिक मार्गदर्शनही देण्यात येणार आहे.पशुपालन हा केवळ जोडधंदा नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

# धारूर तहसील कार्यालयासमोरच केला अपंग शेतकऱ्याने आत्मदहनाचा प्रयत्न



धारूर दि ११ (प्रतिनिधी) - धारूर तालुक्यातील तांबवा गावातील एका अपंग शेतकऱ्याने न्याय मिळत नसल्याच्या नैराश्यातून आज सकाळी धारूर तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न स्थानिक कर्मचाऱ्यांनी वेळीच धाव घेत मध्यस्थी केल्याने मोठा अनर्थ टळला.

गावातील काही व्यक्ती त्याला शेतातील पाणी ओढ्यामध्ये सोडू देत नाहीत. असा या शेतकऱ्याने आरोप करून या संदर्भात त्याने सुमारे तीन वर्षांपूर्वी धारूर तहसील कार्यालयात लेखी अर्ज करून तक्रार दाखल केली होती. मात्र, दीर्घकाळ उलटूनही त्याला न्याय मिळाला नसल्याने तो मानसिक तणावात होता. आज सकाळी तो तहसील कार्यालयात आला असता अचानक अंगावर पेट्रोल ओतून स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. उपस्थित कर्मचाऱ्यांनी तत्काळ त्याला रोखत पेट्रोलची बॉटल बाजूला केला समजूत काढून परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, प्रशासनाकडून संबंधित प्रकरणाची दखल घेण्यात येणार असून शेतकऱ्याच्या तक्रारीची चौकशी करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. या घटनेमुळे तहसील कार्यालयातील कामकाज काही काळ विस्कळीत झाले होते. न्यायासाठी हतबल झालेल्या शेतकऱ्याने उचललेल्या पावलामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# रयत सामाजिक प्रतिष्ठानतर्फे राज्यस्तरीय 'रयत' पुरस्कारासाठी प्रस्तावाचे आवाहन

बीड दि ११(प्रतिनिधी) : रयत सामाजिक प्रतिष्ठान, बीड (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर व्यक्तींना देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय रयत पुरस्कार वितरण सोहळा २०२६ साठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. हा सोहळा शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्रातील नामांकित चित्रपट कलाकार व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.




प्रत्येक व्यक्ती जन्मतः वेगळे अस्तित्व घेऊन येते आणि आयुष्यभर समाजासाठी केलेल्या कार्याची समाज दखल घेत असतो. अशाच समाजशील व कार्यकर्तृत्व सिद्ध केलेल्या व्यक्तिमत्वांचा गौरव करण्याच्या उद्देशाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, साहित्य, वैद्यकीय, कृषी, कला आदी क्षेत्रात ठोस व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचे प्रस्ताव संस्थेकडे पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमास सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, विचारवंत तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. प्रस्ताव पाठविताना संबंधित माहिती सत्य असावी व कोणाच्याही शिफारशीवर आधारित नसावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार समितीकडे राखीव राहील.पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे आहे. इच्छुकांनी आपले प्रस्ताव लवकरात लवकर मोबाईल क्रमांक ७०३५ ३५८३५८ वर संपर्क साधून पाठवावेत, असे आवाहन रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## गुजर समाजाच्या वतीने मंजरीकर महाराजांचा सत्कार

बीड (प्रतिनिधी) : गुजर समाजाचे कैवल्यमूर्ती हरिभक्त पारायण माऊली महाराज मंजरीकर यांच्या ७२ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गुजर समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी सुनील गुजर यांनी महाराजांच्या कार्याचा गौरव करत समाजाला त्यांच्या मार्गदर्शनाची गरज असल्याचे सांगितले.

जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, महाराजांनी भगवी पताका खांद्यावर घेऊन समाजप्रबोधन, प्रवचन आणि योग्य मार्गदर्शनाचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजाला दिशा मिळाली असून ९० टक्के समाज परमार्थाकडे वळला आहे. तसेच त्यांच्या प्रेरणेने सुमारे ५०० युवक शासकीय सेवेत कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, अखिल भारतीय देव सेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, कृषी सहाय्यक सुनील बहिरवाळ, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजाभाऊ गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, शहराध्यक्ष हनुमान बहिरवाळ, माजी सरपंच अर्जुन बहिरवाळ, भाजप युवा नेते राम बहिरवाळ, सखाराम नेहराळे, अशोक बहिरवाळ, किशोर जोगदंड यांसह समाजबांधव उपस्थित होते.

# परळीतील महा पशुधन एक्स्पोला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

किल्ले धारूर दि ११ (प्रतिनिधी) : राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने महापशुधन एक्स्पो चे आयोजन परळी वैजनाथ येथे दि.१३ १४ व १५ फेब्रुवारी रोजी करण्यात आले असून या मधील सर्व कार्यक्रमाचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन धारूर येथील पशुसंवर्धन विभागाच्या वतीने तालुक्यातील शेतकरी व नागरिकांना करण्यात आले आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या वतीने महा पशुधन एक्सपो चे आयोजन दि.१३, १४ व १५ फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ येथे करण्यात आले असून याचे उद्घाटन राज्याच्या पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात येणार असून या एक्सपोज मध्ये तीन दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे व शेतकऱ्यांना व याविषयी आवड असणाऱ्यांना यावर विविध विषयावर मार्गदर्शनही मान्यवर मंडळी करणार आहे. या एक्सपोर्ट चे बक्षीस वितरण समारंभ दि.१५ फेब्रुवारी रोजी दुपारी करण्यात आला असून या समारंभास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस हे उपस्थित राहणार आहेत तर यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री अतुल सावे, मंत्री निलेश राणे, खा. रजनीताई पाटील खा. बजरंग सोनवणे, आ. सतिश चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोंळके , आ. सुरेश धस, आ.संदीप क्षीरसागर आ.नमिताताई मुंदडा, आ. विजयसिंह पंडित नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी आदी उपस्थित राहणार आहेत .या पशुधन एक्स्पोज कार्यक्रमाचा लाभ तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा. असे आवाहन तालुका पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुधन विकास अधिकारी डॉ. आर एम वराडे, पशुधन विस्तार अधिकारी डॉ. ए ए फुंदे, पशुधन पर्यवेक्षक श्रीमती सी जे तांदळे डॉ.आर जी पारवे यान्नी केले आहे.

## राज्यस्तरीय शालेय युनिफाईट स्पर्धेत प्रगती विद्यालयाची बडे अनुष्का हिस ब्रांच मेडल

बीड (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक संचालनालय पुणे द्वारा जिल्हा क्रीडा कार्यालय रायगड तथा रायगड युनिफाईड असोशियन द्वारा राज्यस्तरीय शालेय युनिफाईड क्रीडा स्पर्धा दिनांक ४व ५ फेब्रुवारी २०२६ रोजी लक्ष्मी पब्लिक स्कूल सुकापुर पनवेल जिल्हा रायगड या ठिकाणी राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी तथा खेळाडू बडे अनुष्का आनंद ४५ किलो वजन गटात राज्यात तिसरी म्हणजेच ब्रांच पदक प्राप्त केले आहे त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक आदरणीय राम कृष्णजी बांगर साहेब सचिव सौ सत्यभामाताई बांगर युवा नेता बाळासाहेब बांगर विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री गोपाळ घरे सर कंठाळे सर क्रीडा शिक्षक शेख अहमद सर घोळवे सर जायभाय सर ढवळे सर कदम सर सानप सर ढाकणे सर वाघवाले सर नागरगोजे सर कंठाळे सर अग्रवाल मॅडम मिसाळ मॅडम नांदगावकर मॅडम परजने मॅडम निकाळजे मॅडम काकडे मॅडम सोनवणे मॅडम सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या

# उमरीचे प्रगतशील शेतकरी आण्णा घायतिडक यांचा बहुपिक शेतीचा प्रयोग

**पाच एकरात केली अनेक पिकांची लागवड; बहुपिक शेती ठरतेय सर्वांना आदर्श**

माजलगांव / तुकाराम येवले

माजलगाव तालुक्यातील उमरी येथील प्रगतशील शेतकरी आण्णा प्रकाश घायतिक यांनी पहिल्यांदाच बहुपिक शेतीचा यशस्वी प्रयोग करत पाच एकरात त्यांनी उस, कांदा, लसुण, गहु, हरभरा, जवस, लाख, मोहरी, जनावरांचे गवत, नारळ आदी पिकांची लागवड करत बहुपिक शेती यशस्वी करण्याचा प्रयत्न केला असन होत सर्वांना आदर्शवत ठरत आहे.



तालुक्यातील उमरी येथील प्रगतशील शेतकरी अण्णा घायतीडक यांनी पारंपरिक शेतीपद्धतीला छेद देत बहुपीक शेतीचा यशस्वी प्रयोग राबवला आहे. कमी खर्चात आणि योग्य नियोजनाच्या जोरावर त्यांनी एकाच शेतात विविध पिकांची लागवड करून उत्पादनात व उत्पन्नात वाढ साधली आहे. अण्णा घायतीडक यांनी उस, कांदा, लसुण, गहु, हरभरा, जवस, लाख, मोहरी, जनावरांचे गवत, नारळ आदी पिकांची एकत्रित लागवड केली आहे. पाण्याचे योग्य व्यवस्थापन, खतांचा वापर आणि ठिबक सिंचन प्रणालीचा अवलंब यामुळे उत्पादन खर्च कमी झाला आहे. तसेच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यातही यश आले आहे. बहुपीक पद्धतीमुळे एका पिकावर अवलंबित्व राहत नाही. एखादे पीक नुकसान झाले तरी दुसऱ्या पिकातून उत्पन्न मिळते, त्यामुळे आर्थिक जोखीम कमी होते. याशिवाय वर्षभर शेतात काम उपलब्ध राहिल्याने मजुरांनाही रोजगार मिळतो. अण्णा घायतीडक यांच्या या प्रयोगामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. बहुपीक शेती ही बदलत्या हवामान परिस्थितीत शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरत असून अण्णा घायतीडक यांचा प्रयोग इतरांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

# सावरकर महाविद्यालयात 'ई-टेंडरिंग' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा



बीड (प्रतिनिधी) भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथील वाणिज्य विभागाच्या वतीने बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'ई-टेंडरिंग' प्रणाली प्रक्रिया, संधी आणि आव्हाने '' या समकालीन व महत्त्वपूर्ण विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डिजिटल युगात शासकीय व निमशासकीय कामकाजात वाढत्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या 'ई-टेंडरिंग' प्रक्रियेविषयी विद्यार्थ्यांना व तरुण नवउद्योजकांना सखोल व व्यावहारिक मार्गदर्शन मिळावे, यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसाद मुंडे ( माजी विद्यार्थी, सदस्य -महाविद्यालय विकास समिती, बीड) हे उपस्थित होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून हर्षद बर्गे (संचालक, टी. जी. फाउंडेशन, छत्रपती संभाजीनगर ) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगावंकर व डॉ. उत्तम साळवे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात पंडित दीनदयाळ उपाध्याय व स्वा. सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. सभागृहात सहभागी तरुण नवउद्योजक , प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विद्याशाखेचे प्रमुख डॉ. रमेश खंडागळे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात ई-टेंडरिंग ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून पारदर्शकता, जबाबदारी व कार्यक्षमता वाढविणारी एक आधुनिक प्रणाली असल्याचे सांगितले. स्पर्धात्मक परीक्षांच्या व व्यावसायिक क्षेत्रातील संधींच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी या विषयाचे ज्ञान आत्मसात करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख पाहुणे प्रसाद मुंडे यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. ई-टेंडरिंगमुळे शासकीय कामकाजात पारदर्शकता व वेग वाढला असून भ्रष्टाचाराला आळा बसण्यास मदत होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डिजिटल इंडियाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी तरुण पिढीने तंत्रज्ञानाशी सुसंगत राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. प्रमुख मार्गदर्शक हर्षद बर्गे यांनी ई-टेंडरिंग प्रक्रियेचे अत्यंत सविस्तर व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांनी ई-टेंडरिंगची संकल्पना, नोंदणी प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट, डिफेक्ट लायबिलिटी पिरियड , बी.ओ.टी. चे महत्त्व, विविध शासकीय पोर्टल्सचा वापर, टेंडर दस्तऐवज डाउनलोड व अपलोड करण्याची पद्धत, तसेच प्रत्यक्ष उदाहरणांसह संपूर्ण प्रक्रिया स्पष्ट केली. त्यांनी विद्यार्थ्यांना ई-टेंडरिंगमधील संधी, करिअरच्या शक्यता व उद्योजकतेतील उपयोग या विषयीही मार्गदर्शन केले. शंका निरसन सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले, ज्यांची समाधानकारक उत्तरे मार्गदर्शकांनी दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान व कौशल्ये प्राप्त होतात, असे मत व्यक्त केले. वाणिज्य विभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने उपक्रम राबवावेत, असे आवाहन करून त्यांनी विभागाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुभाष पटेकर यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. भावना देव यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी व सहयोगी कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानले. ही एकदिवसीय कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, उपयुक्त व प्रेरणादायी ठरली असून यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## जीवनातील विविध घटना, प्रसंग अचुक सांगणारे राजेंद्र महाराज लोखंडे यांचे कार्य कौतुकास्पद



बीड दि ११(प्रतिनिधी)-राजेंद्र महाराज लोखंडे या अवलियाला एक अदभुत किमया अवगत आहे. लोखंडे महाराज आपल्या अदभुत लॉजीकने पुढील व मागील अनेक वर्षामधील सणावारांच्या तारखा अगदी अचुकपणे सांगतात. एवढे च नाही तर समोरील माणसांच्या जन्मतारखा देखील वारासह सांगतात. लोखंडे महाराजांचे हे कार्य अद्भुत आणि कौतुकास्पद असल्याचे मत भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे यांनी प्रसिद्धी पत्रकात व्यक्त केले.

पाटोदा तालुक्यातील दिघोळ येथील राजेंद्र गंगाराम लोखंडे हे काही वर्षांपूर्वी शिक्षण व कामाच्या निमीत्ताने पाटोदा शहरात आले आणि येथेच स्थायिक झाले. शाळेत असल्यापासुनच राजेंद्र लोखंडे हे अध्यात्मिक वृत्तीचे आहेत.पाटोद्यात आल्यानंतर त्यांनी एम.ए. पर्यंतचे आपले शिक्षण पूर्ण करून काही काळ ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत नोकरी ही केली, मात्र त्यांच्या अध्यात्माकडेच अधिक कल राहीला. मनुष्याचा फक्त चेहरा पाहून ते जन्मतारखेपासून, मृत्युच्यातारखे पर्यंतचा जीवनपट सांगतात. लोखंडे महाराजांनी राज्याच्या व बीड जिल्हयाच्या राजकारणावर आपले अंदाज व मत नोंदवले. पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाकडे जाणाऱ्या रोडवर लोखंडे महाराज राहतात. बालवयात लोखंडे महाराजांवर धार्मिक संस्कार झाले असल्यामुळे अध्यात्माची चांगल्या प्रकारे त्यांना आवड निर्माण झाली आहे .आपल्याकडे हस्तरेषा किंवा चेहरापाहून भविष्य सांगणारी माणसं आहेत पण ज्योतिष शास्त्राचा कसलाही अभ्यास न करता लोखंडे महाराज माणसाच्या जीवनाबाबत ज्या गोष्टी सांगतात हे मात्र आश्चर्यपेक्षा कमी नाही असेल नवनाथांना शिराळे यांनी नमूद केले.

# तलवाडा जि.प.उर्दू शाळेला हक्काची स्वतंत्र इमारत देखील मिळेना

**कन्या शाळेच्या इमारतीचा आधार घेवून करावे लागते ज्ञानार्जन**

गेवराई दि.११ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील तलवाडा जि.प.उर्दू शाळेला इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत शासन मान्यता मिळालेली आहे. नववी ते दहावी हे दोन वर्ग जि.प.मा.शाळेला संलग्न करण्यात आलेले आहेत. परंतु तलवाडा येथील कन्या शाळेच्या इमारतीचा जि.प.उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांना आधार घ्यावा लागत आहे. उर्दू शाळेची स्थापना सन २००० साली झाली आहे. अनेक वर्षांपासून इमारतीचा प्रश्न प्रलंबित आहे. उर्दू शाळेच्या शालेय समितीने स्वतंत्र इमारतसाठी माजी आ.अमरसिंह पंडित यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. परंतु अद्यापपर्यंत मंजुरी मिळाली नाही. तलवाडा येथील एकाही लोकप्रतिनिधीला मात्र जाग येईना. शासन म्हणतेय की एक रोटी कम खाओ लेकिन बच्चोंको पढाओं. शासनाने लक्ष देऊन तात्काळ प्रश्न सोडवावा अशी मागणी पालक वर्गातून होत आहे. विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड व शैक्षणिक नुकसान शासनाने थांबावे, कारण की शिक्षण घेण्यासाठी हक्काची इमारत नसल्याने विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये नाराजगी पसरली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



जि.प.उर्दू शाळेच्या इमारती संदर्भात आ.विजयसिंह पंडित यांच्याकडे देखील शालेय समितीने मागणी केली आहे असे शालेय समितीचे अध्यक्ष शेख जाकेर मौलाना सिद्दिकी यांनी सांगितले आहे. जि.प.उर्दू शाळेला हक्काची इमारत नसल्याने ती कधी मिळणार आहे असा प्रश्न विद्यार्थ्यांसह पालकांना पडला आहे. तलवाडा येथील उर्दू शाळा सन २००० साली स्थापना झाली आहे. परंतु अद्यापपर्यंत उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना स्वतंत्र इमारत उपलब्ध झालेली नाही. संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी जातीने लक्ष देऊन उर्दू शाळेसाठी स्वतंत्र इमारत मंजूर करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अल्ताफ कुरेशी यांनी देखील केली आहे.

## जाहीर प्रगटण

सर्व जनतेस या प्रगटणाद्वारे कळवण्यात येते की, मौजे रांजणी ता. गेवराई जि.बीड येथील श्री राजेश बाबू माने व श्री सोमेश्वर बाबू माने दोघे रा. रांजणी ता. गेवराई जि. बीड येथील रहिवासी असून त्यांचे मालकी ताब्यातील गट क्र. ६७६ गट क्र. ६७८ मधील दोघांचे मालकीचे दक्षिण बाजूचे एकूण क्षेत्रफळ ६२.५ गुंठे कायम खरेदी करण्याचा करार केला असून त्या क्षेत्राची एकत्रित चतुः सिमा खालील प्रमाणे आहे

**पूर्व :** धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग ५२ चा सर्विस रोड, **पश्चिम:** ३० फूट रस्ता, **दक्षिण :** गट क्र. ६७९., **उत्तर :** गट क्र.६७६ सावंत यांची जमीन, गट क्र. ६७८ मधील प्रल्हाद माने जमीन

वरील वर्णनाची व मालकीची जमिनीचे खरेदीखत दहा (१०) दिवसात करण्यात येणार आहे. सदर जमिनी बाबत कोणाचा आक्षेप, उजर, दान, गहाण, तारण असल्यास लेखी पुराव्यासह खालील पत्त्यावर दहा (१०) दिवसाच्या आत कळवावे. तसा लेखी आक्षेप नोंदवण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व खरेदीखत करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटण देण्यात येते.

जाहीर प्रगटन देणार
**संतोष हरिचंद कात्रेला**
अरिहंत सेल्स, जुना मोंढा, बीड
मो. ९८२२०२२८९७

# शेतीरस्ता अडविल्यामुळे ढोरगाव/लवूळ रस्त्यावर आमरण उपोषण व रस्तारोको आंदोलन करणार-रंगनाथ राठोड

लवूळ दि.११(प्रतिनिधी)- माजलगाव तालुक्यातील खानापूर शिवारातील गट नंबर ४१ व ४२ मधील नंबर रस्ता गेल्या दीड वर्षापासून शेतकरी महादेव भगवान करांडे व इतर जणांनी ऊस जाण्यासाठी रस्ता अडविलेला आहे, याची माहिती वेळोवेळी माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आलेली आहे पण यावर अद्यापपर्यंत कोणतीही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. आमच्या सर्व शेतकऱ्यांचे शेतातील ऊस सध्या गाळपाअभावी उभे आहे, ऊस जाण्यासाठी सध्या रस्ता नाही. गट नंबर ४२ मधील ऊस गाळप करण्यापासून शेतात उभा राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी तहसील कार्यालयाची राहील, असे शेतकरी रंगनाथ वालु राठोड केलेले आहे याची गंभीरतेने दखल घ्यावी. सदरील हा रस्ता १६/२/२०२६ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करून देण्यात यावा नसता, आम्ही सर्व प्रभावित शेतकरी दिनांक १७/२/२०२६ वार मंगळवार या दिवसापासून ढोरगाव/ लऊळ रस्त्यावर आमरण उपोषणास बसणार आहे व त्यानंतर जर रस्ता खुला करण्यात आला नाहीतर पुढे रस्ता रोको आंदोलन करणार याची सर्व जबाबदारी माजलगाव तहसील कार्यालयाची राहील. माजलगाव तहसील कार्यालयात दिनांक १०/२/२०२६ रोजी याबाबतची सर्व माहिती पत्रकातून केलेली असून ती देण्यात आलेली आहे. माननीय माजलगाव तहसीलचे तहसीलदार साहेब यांनी या बाबीचा गांभीर्यपूर्वक विचार करून हा रस्ता आमच्या ऊसाला गाळपासाठी खुला करण्यात यावा, अशी मागणी लवूळ क्रमांक १ येथील रंगनाथ वालु राठोड, जगन्नाथ खेमा राठोड, अशोक भीमा राठोड, सिद्धेश्वर दुधा राठोड व महादेव शिंदे यांनी निवेदनातून केलेले आहे.

# पार्श्वभूमी

दि.१२ फेब्रुवारी २०२६ गुरूवार




### शे.गफुरभाई इनामदार यांचे निधन



कवडगाव बु दि ११ (प्रतिनिधी) -वडवणी तालुक्यातील कवडगाव बु येथील शे.आशेफभाई इनामदार यांचे वडील शे.गफुर शे.आजमोद्दीन इनामदार यांचे दि.१०रोजी अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यूसमयी त्यांचे वय ९२होते त्यांच्या निधनाने इनामदार कुटुंबियावर शोककळा पसरली आहे काल त्यांचे पार्थिव देहावर दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांचे पश्चात त्यांना मुले शे.आशेफ,शे.आबेद,शे.सादेक यांचेसह सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांचे दुःखात पार्श्वभुमी परिवार सहभागी आहे.

### इंदुबाई पौळ यांचे निधन



माजलगाव दि.११(प्रतिनिधी) - तालुक्यातील उमरी येथील छायाचित्रकार दिपक पौळ यांच्या आई इंदुबाई सोपानराव पौळ यांचे दि.११ बुधवार रोजी सकाळी ९ वा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी त्याचे वय ७५ वर्षे होते.त्याच्या पार्थिव देहावर उमरी येथील सरस्वती नदी तिरावरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पान २ वर

# पंचायत समिती माजलगावचा घरकुल विभाग ऑपरेटरच्या ताब्यात?

## आझाद क्रांती सेनेचा आंदोलनाचा इशारा



माजलगाव दि ११(प्रतिनिधी)- पंचायत समिती माजलगाव येथील घरकुल विभाग सध्या खाजगी संगणक ऑपरेटरच्या ताब्यात दिलेल्या असल्याची गंभीर बाब समोर आलेली आहे.तो खाजगी ऑपरेटर कुणाचीच पर्वा करत नाही.कंत्राट बेसवर बसलेले अधिकारी तो खाजगीच असतो हे लक्षात असून सुद्धा त्यांना विस्तार अधिकाऱ्याची पोस्ट दिली की काय? हे समजत नाही.घरकुल योजनेची संबंधित कामकाज त्याचा अंतिम शब्द मानल्या जात असल्याची चर्चा सुरू आहे. या प्रकरणात गटविकास अधिकारी संबंधित ऑपरेटरला जाणीवपूर्वक शह देत आहेत का ? तसेच विस्तार अधिकारीही या गैरप्रकारात सामील आहेत का?असे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजना गरजू लाभार्थ्यांना अत्यंत कडू व अपमानास्पद वागणूक दिली जात, असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत.घरकुल मंजुरी हप्ते कागदपत्रे यासाठी लाभार्थ्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागत, असून त्या ऑपरेटर कंत्राटी अधिकाऱ्याच्या मग्रुरीपणामुळे प्रशासन हदबल झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे गरीब वंचित आणि गरजू नागरिकां मध्ये तीव्र संतापाची लाट आहे. या सर्व प्रकारच्या निषेधार्थ आझाद क्रांती सेना आक्रमक झाली. असून घरकुल पान २ वर

# आष्टी तालुक्यात युरिया खताची टंचाई चढ्या दराने विक्रीने शेतकरी हतबल

आष्टी दि.११(प्रतिनिधी)- सध्या आष्टी तालुक्यात युरिया खताची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, याचा गैरफायदा काही कृषी सेवा केंद्र चालक घेत असल्याचे चित्र दिसत आहे. शासकीय दरापेक्षा तब्बल १५० ते २०० रुपये जास्तीने युरियाची विक्री केली जात असून, शेतकऱ्यांची उघडपणे लूट सुरू आहे. विशेष म्हणजे, कृषी विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

आष्टी तालुक्यात सध्या रब्बी हंगामासाठी युरियाची मोठी मागणी आहे. मात्र, बाजारपेठेत युरिया उपलब्ध नसल्याचे सांगून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. ज्या दुकानदारांकडे स्टॉक आहे, ते दुकानदार २६६ रुपयांची बॅग ४०० ते ५०० रुपयांना विकत आहेत.

एवढ्यावरच न थांबता, 'लिंकिंग'चा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. जर शेतकऱ्याला युरियाची एक बॅग हवी असेल, तर त्यासोबत गरज नसताना इतर महागडी विद्राव्य खते किंवा औषधे घेण्याची सक्ती केली जात आहे. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. दरम्यान एकीकडे कांद्याचे भाव कोसळल्याने आणि शेतीमालाला योग्य भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहे, तर दुसरीकडे खत खरेदीसाठी त्याला खिसा रिकामा करावा लागत आहे. आम्ही जगायचं कसं? असा संतप्त सवाल तालुक्यातील पान २ वर

## चंद्रकांत गणगे यांचे निधन

बीड दि.११ ९प्रतिनिधी)- शहरातील पांगरी रोड परिसरातील विश्वास नगर येथील रहिवासी चंद्रकांत गणगे यांचे मंगळवारी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५२ वर्षे होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात शोककळा पसरली.

चंद्रकांत गणगे हे मनमिळावू व शांत स्वभावाचे म्हणून परिचित होते. सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांमध्ये ते नेहमी सक्रिय सहभाग घेत असत. परिसरातील नागरिकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबियांसह मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ व बहीण असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल विश्वास नगर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## नेकनुरमध्ये रमजान महिन्यात वीज पुरवठा सुरळीत ठेवा-सय्यद शोएब



बीड (प्रतिनिधी):- नेकनूर येथील रमजानच्या पवित्र एक महिन्यात लोड सीटिंग व उच्च दाबाची वीज दिवसातून शंभर वेळेस जाणारी वीज थांबवावी गावकऱ्यांना होणारा त्रास थांबवा या मागणीसाठी सय्यद शोएब यांनी प्रशासनाला निवेदन दिले.

नेकनुर शहरात दि.१८ ते २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पर्यंत लाईट जाऊ नये व लपंडाव होऊ नये व उच्च दाबाची लाईट द्यावी एक महिना रमजान च्या रोजे उपवास सुरू होत आहे व उन्हाळ्याचे दिवस येत आहे त्यामुळे रोजा मध्ये व स्त्रियांना सहेरीसाठी पहाटे तीन वाजता स्वयंपाक करण्यासाठी स्त्रियांना उठावे लागते त्यावेळेस लाईट जाऊ नये व रात्री तरावीच्या नमाज च्या वेळी लाईट जाऊ नये यासाठी लहान थोर स्त्रिया मुले मुली सर्वांना रोजा, उपवास ठेवण्यासाठी सर्व गावकऱ्यांना रात्री तीन वाजता सहेरी करण्यासाठी उठावे लागत आहे त्यावेळेस अंधारा होऊ नयेमध्ये स्वयंपाक करणार कठीण होत आहे वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष देऊन आमची मागणी पूर्ण करावी या मागणीसाठी लोकशाहीच्या मार्गाने जिल्हाधिकारी बीड, मंत्री पंकजाताई पान २ वर

## ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटचे व्हॉलीबॉलमध्ये घवघवीत यश





माजलगाव (प्रतिनिधी):- ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी व विद्यार्थिनींनी वॉलीबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या नावलौकिकात भर घातली आहे. नुकत्याच पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन वॉलीबॉल स्पर्धेत महिला संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पहिला क्रमांक पटकावला, तर पुरुष संघाने दमदार खेळ करत दुसरा क्रमांक मिळवला.

महिला संघाने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण, शिस्तबद्ध आणि संघभावनेने खेळ करत प्रत्येक सामन्यात प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. अंतिम सामन्यात त्यांनी अत्यंत चुरशीच्या लढतीत विजय मिळवत विजेतेपदावर आपले नाव कोरले. खेळाडूंचा आत्मविश्वास, वेगवान हालचाली आणि अचूक समन्वय हे त्यांच्या यशाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. त्याचप्रमाणे, पुरुष संघानेही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. कठीण प्रतिस्पर्ध्यांशी लढत देत त्यांनी दुसरा क्रमांक पटकावला. त्यांच्या जिद्दी खेळाने प्रेक्षकांची मने जिंकली. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ.सुशील लोढा व प्राचार्य प्रतीक वेळापुरे , क्रीडा शिक्षक सुलतान सर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमधील क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.या यशामुळे संस्थेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळाली असून भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये यश मिळवण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# पाटोद्यातील गोविंद महाराज समाधीस्थळ जीर्णावस्थेत ; तीनशे वर्षांचा वारसा धोक्यात

## जीर्णोद्धारासाठी आ.सुरेश धस यांनी लक्ष घालण्याची भाविकांची मागणी





पाटोदा दि.११(महेश बेदरे):- शहरातील भगवान परशुराम नगर (ब्राह्मण गल्ली) परिसरात असलेले सुमारे तीनशे ते साडेतीनशे वर्षांचा इतिहास लाभलेले गोविंद महाराजांचे पुरातन मंदिर व समाधीस्थळ सध्या जीर्ण अवस्थेत असून तातडीच्या जीर्णोद्धाराची गरज निर्माण झाली आहे. वैयक्तिक जागेत असलेला हा वाडा असला तरी येथे प्रतिष्ठापित असलेल्या विठ्ठल-रुक्मिणीच्या पुरातन मूर्ती आणि संतस्वरूप गोविंद महाराजांची समाधी यामुळे हे स्थळ भाविकांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान मानले जाते.

स्थानिक आख्यायिकेनुसार, सिद्धपुरुष म्हणून ओळखले जाणारे गोविंद महाराज यांनी स्वतः पंढरपूर येथे जाऊन विठ्ठल-रुक्मिणीच्या सुंदर दगडी मूर्ती आणल्या व या ठिकाणी त्यांची विधिवत प्रतिष्ठापना केली. त्या काळात पाटील घराण्यातील दगडूबा पाटील यांनी मंदिर उभारणीस मदत केल्याचे सांगितले जाते. तसेच संगमेश्वर मंदिर परिसरातील एकाच बाभळीच्या लाकडाचा उपयोग करून वाड्यावजा मंदिराची उभारणी करण्यात आल्याची आख्यायिका आजही परिसरात सांगितली जाते. पुढे याच ठिकाणी गोविंद महाराजांची समाधी बांधण्यात आली आणि त्यामुळे हे स्थान वारकरी परंपरेचे प्रतीक बनले.

मात्र काळाच्या ओघात मंदिराचा बाह्यभाग पूर्णपणे जीर्ण झाला आहे. भिंतींना तडे गेले असून छताची झीज झाली आहे. संरक्षणाचा अभाव आणि देखभालीची कमतरता यामुळे समाधीस्थळासह मूळ वास्तूचे अस्तित्व धोक्यात आले आहे. स्थानिक भाविकांचे म्हणणे आहे की, हा केवळ एक वाडा नसून पाटोद्यातील धार्मिक व सांस्कृतिक वारशाचा जिवंत ठेवा आहे. खासगी मालकीचा प्रश्न असला तरी श्रद्धास्थान म्हणून या ठिकाणाचा जीर्णोद्धार होणे अत्यावश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. नगरपंचायतीने आवश्यक तांत्रिक बाबी पान २ वर

### पत्रकारांचा स्तूत्य उपक्रम...!

## शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून एसटी बसेसला दिल्या नवीन डिजिटल पाट्या



बीड दि.११(प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील पिंपळनेर पत्रकार संघ व सामाजिक कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून बीड आगारातील एसटी महामंडळाच्या अनेक एसटी बसेस वर लावण्यात येणाऱ्या गावाच्या नावांच्या पाट्या जीर्ण झाल्यामुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत असे. ही समस्या लक्षात घेऊन पिंपळनेर पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवप्रसाद सिरसाट यांनी नवीन डिजिटल गावाच्या नावांच्या पाट्या तयार करून एसटी प्रशासनाला भेट दिल्या. शिवप्रसाद सिरसाट यांनी हाती घेतलेल्या या नवीन उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे. पान २ वर

## आज जिल्हा नियोजन समितीची बैठक

बीड, दि. ११ (जिमाका) : गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन केले आहे. गुरुवार दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क,क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक तथा बीड जिल्हयाच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीचे आयोजन केले आहे. संबधित अधिका-यांनी वेळेवर या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव विवेक जॉन्सन यांनी केले आहे.यानंतर लगेचच १.४५ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्याची सन २०२६-२०२७ नियोजन आराखडा बैठक होणार आहे.

## तलवाडयात श्री शिवमहापुराण कथा उत्साहात सुरू



तलवाडा दि.११ (प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथील संकटेश्वर मंदिर याठिकाणी श्रीराम संस्थानचे मठाधिपती कृष्णा महाराज गोसावी यांच्या आशीर्वादाने व हभप नवनाथ महाराज गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकटेश्वर तरूण मंडळ यांच्या वतीने महाशिवरात्री निमित्त सोमवार दि.९ ते दि.१६ फेब्रुवारी सोमवार या कालावधीत श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. हभप सोनाली दीदी करपे यांच्या शिष्या हभप कल्याणीताई खेडकर (श्रीक्षेत्र सदगुरू कल्याण स्वामी संस्थान चकलांबा) पान २ वर

## कॉपीमुक्त अभियान राबविणाऱ्या शिक्षण विभागाच्या दिव्याखाली अंधार-डॉ.गणेश ढवळे

बीड दि.११(प्रतिनिधी) -महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता १२ वीच्या परीक्षेला दि. १० पासून सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यातील १०३ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, कंट्रोल रूम तसेच संवेदनशील केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे देखरेख ठेवून भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा जिल्हा प्रशासन करत आहे. मात्र प्रत्यक्षात परळी तालुक्यातील नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय प्रकरणामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.परळी शहरात परीक्षा केंद्र असल्याचे बोर्डाकडे नमूद करण्यात आले असताना प्रत्यक्षात परीक्षा जिरेवाडी येथील शारदा विद्या मंदिर (माध्यमिक व प्राथमिक शाळा) येथे घेण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी परीक्षा घेण्यासाठी कोणतीही अधिकृत पान २ वर

# आज डोंगरकिन्ही ते गहीणीनाथ गड पायी दिंडीचे प्रस्थान



डोंगरकिन्ही (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथे संत वामनभाऊ महाराज मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.दि. १२ ते १६ फेब्रुवारी पासून डोंगरकिन्ही ते गहीणीनाथ गड पायी दिंडी सोहळा संपन्न होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी पायी दिंडी मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.गेल्या २९ वर्षापासून प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षी डोंगरकिन्ही ते गहिनीनाथ गड पायी दिंडी सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी १२ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी सकाळी ८ वा. डोंगरकिन्ही येथून दिंडीचे प्रस्थान होणार आहे. सकाळी अभिषेक केल्या नंतर गावातुन शोभायात्रा आणि नंतर गडाकडे प्रस्थान होईल . मुंजारवस्ती, म्हस्के वस्ती, मांडवेवाडी, नागेशवाडी, वांजराउगम, गवळवाडी, कुसळंब,मुक्काम. दि १३ रोजी सुप्पा ,सावरगाव, वहाली , निवडुंगा गहिनीनाथगड खालचा,गहिनीनाथ गड मुक्काम.तर परतीचा प्रवास मिसाळवाडी पिंपळवंडी पांगरी मार्गे दि १६ रोजी डोंगरकिन्ही येथे येईल व शोभायात्रा होऊन संत, ह.भ.प. , मान्यवर यांच्या उपस्थितीत सप्ताहास सुरुवात होईल तरी या सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविकांनी सहभागी होऊन शोभा वाढवावी असे आवाहन संत वामनभाऊ महाराज मंदिर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन दि.१२/०२/२०२६

**विद्यमान दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)**

**नियमित दिवाणी दावा क्र.: ८३ / २०२६**

**विठ्ठल रामभाऊ आंधळे..वादी**

**विरुद्ध**

**उषाताई महादेव गर्जे.प्रतिवादी**

या जाहीर नोटीसद्वारे आपण प्रतिवादी, सौ.उषाताई महादेव गर्जे वयः ७२ वर्ष,रा.गाव सांगवी,ता.पाटोदा, जि. बीड.

यांना या नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, वरील वादी यांनी मा. न्यायालयात तुमच्या विरुद्ध मौजे गारखेडा (शहरी), ता. व जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. ३६/२ मधील श्री भगवानबाबा नगर या ले-आउटमधील १५.१७ आर क्षेत्र जमिनीसंदर्भात, तुम्हाला व तुमच्या प्रतिनिधींना हस्तांतरण किंवा अडथळा निर्माण करण्यापासून रोखण्यासाठी कायमस्वरूपी मनाई हुकूम मिळण्याबाबत सदर दावा दाखल केला आहे.

आणि ज्याअर्थी, माननीय न्यायालयाने आदेशित केल्यानुसार तुम्हाला या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की , तुम्ही स्वतः किंवा तुमच्या कायदेशीर वकिलामार्फत दिनांकः १६.०२.२०२६ रोजी या न्यायालयात (८ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औरंगाबाद) हजर राहून आपला लेखी जबाब (थीळींशप डीरींशाशपीं) दाखल करावा व अर्जदाराचे अर्जाप्रमाणे हुकूम का करू नये या विषयाचे कारण दाखवावे. सदरहू प्रमाणे हजर होऊन कारण न दाखविल्यास अर्जदाराचे अर्जाप्रमाणे किंवा कोर्टास योग्य वाटेल तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०२/२०२६ रोजी माननीय न्यायालयाच्या आदेशावरून प्रसिद्ध केले.

(न्यायालयाचा शिक्का)

स्वाक्षरी,
**अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर),
छत्रपती संभाजीनगर